अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि. ३ सप्टेंबर २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : ३३५ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## पाकला धूळ चारून भारताने हॉकीत आशिया चषक जिंकला

**नवी दिल्ली :** हॉकीच्या मैदानात भारताने पाकिस्तानचा धुव्वा उडवला. हॉकी आशिया चषकात भारताने पाकिस्तानवर ६-४ असा दणदणीत विजय मिळवला आहे. मनिंदर ,मोहम्मद रहील,पवन राजभर आणि गुरजोत सिंह यांनी आपल्या सर्वोच्च खेळाचे प्रदर्शन केले. पाकिस्तानचा संघ एकवेळ ३-२ असा आघाडीवर होता. पण भारतीय खेळाडूंनी अखेरच्या काही मिनिटांमध्ये आपला खेळ उंचावला. दोन सत्राचा खेळ संपला तेव्हा भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना ४-४ असा बरोबरीत सुटला होता. सामन्याचा निकाल पेनल्टी शूटआऊटमध्ये लागला. पहिल्या हाफमध्ये पाकिस्तानच्या संघाने सामन्यावर वर्चस्व मिळवले होते. पण भारताने दमदार कमबॅक केले.

## भारत - पाक सामना पावसामुळे रद्द

**पेनीकल्ले :** आशिया चषकाचा तिसरा सामना भारत आणि पाकिस्तान यांच्यातील शनिवारचा आशिया चषक क्रिकेट सामना पावसामुळे रद्द झाला. या सामन्यात भारतीय संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. टीम इंडियाने प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानसमोर २६७ धावांचे लक्ष्य ठेवले आहे. टीम इंडिया ४८.५ ओव्हरमध्ये २६६ धावांवर गडगडली. भारताकडून इशान किशन आणि हार्दिक पंड्या यांनी अनुक्रमे ८२ आणि ८७ धावा केल्या. पाकिस्तानकडून शाहीन आफ्रिदीने ४ तर हरिस आणि नसीमने ३-३ बळी घेतले. भारताची फलंदाजी संपल्यानंतर पाऊस सुरु झाला. रात्री उशिरापर्यंत पाऊस न थांबल्याने सामना रद्द करण्यात आला.

# सहनशीलता संपलीय, जागा दाखवून देवू
# मराठा बांधव एकवटले, शासनाला ठणकावले

सुराज्य/सोलापूर

**जालना येथे मराठी समाजाच्या आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांवर पोलिसांनी केलेल्या लाठीमार प्रकरणाचे तीव्र पडसाद सोलापूरसह जिल्ह्यात उमटले आहेत.शनिवारी सोलापुरात आणि जिल्ह्यात विविध संघटनांनी रस्त्यावर येवून या पोलिसांच्या दंडेलशाहीचा निषेध केला तसेच सरकारविरूद्ध घोषणाबाजी करून उपमुख्यमंत्री तथा राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राजीनाम्याची मागणी केली. शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाच्या वतीने सोलापुरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सरकारच्या विरोधात आंदोलन केले. सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्या विरोधात घोषणाबाजी केली.पंढरपूर,माढा,अक्कलकोट,मोहोळ ,बार्शी आदी ठिकाणीही मराठा समाजातील कार्यकर्ते रस्त्यावर उतरले होते.मोहोळमध्ये एसटीवर दगडफेक झाल्याचे सांगण्यात येते.आता आमची सहनशिलता संपली आहे.सत्ताधाऱ्यांना त्यांची जागा दाखवून देवू असा इशारा सकल मराठा समाजाने दिला आहे.**

## जालना लाठीमार प्रकरणाचे सोलापुरातही संतप्त पडसाद






जालना जिल्ह्यात मराठा आरक्षण मिळावे म्हणून लोकशाही पद्धतीने उपोषण आंदोलन करणाऱ्या मराठा समाजातील अनेक तरुण, महिला, मुले यांच्यावर तेथील पोलिस प्रशासनाने जबरी लाठी हल्ला केला. तर रबरी गोळ्या मारून आंदोलन चिरडण्याचा जो प्रयत्न केला. त्याच्या निषेधार्थ शनिवारी शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने सकाळी छत्रपती शिवाजी महाराज चौकात निषेध आंदोलन केले.या घटनेला जबाबदार असलेल्या मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली.

शहराध्यक्ष भारत जाधव, माजी महापौर मनोहर सपाटे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांचे बॅनर हातात धरून धिक्कारच्या घोषणा दिल्या. सरकारचे करायचे काय? खाली मुंडी वर पाय, राजीनामा द्या राजीनामा द्या, गृहमंत्री फडणवीस राजीनामा द्या, मराठा समाजाला आरक्षण मिळालेच पाहिजे, छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी, एक मराठा लाख मराठा अश्या घोषणा देत परिसर दणाणून सोडला.

**अन्याय करणाऱ्यांना जागा दाखवू**
**संभाजी ब्रिगेडचा कोंडी येथे इशारा**

अंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षणासाठी बेमुदत उपोषणाला बसलेल्या व तेथे जमलेल्या आंदोलनकर्त्यावर लहान मुलासह,महिलांवर देखील अमानुष लाठीमार केल्याच्या निषेधार्थ संभाजी ब्रिगेडच्या वतीने कोंडी येथे सोलापूर पुणे महामार्गावर एक सात रस्ता रोको करत चक्का जाम आंदोलन केले.

संभाजी ब्रिगेडचे जिल्हा अध्यक्ष सोमनाथ राऊत यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. एक मराठा लाख मराठा जय भवानी जय शिवाजी राज्य सरकारचा निषेध असो अशा घोषणा देत हे आंदोलन करण्यात आले. मराठा आरक्षणासाठी बेमुदत उपोषणाला बसलेल्या महिला, लहान मुले, वृध्द यांच्यावर पोलिस प्रशासनाने सरकारच्या सांगण्यावरून जो हल्ला केला आहे. याची चौकशी करून हल्ला करण्याचे आदेश देणाऱ्या पोलीस अधीक्षकावर कारवाई करावी, अशी मागणी यावेळी आंदोलनकर्त्यांनी केली. सुमारे एक तास भर हे आंदोलन करण्यात आल्याने रस्त्यांच्या दोन्ही बाजूस वाहनाच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या त्यामुळे काही वेळ या महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.

या आंदोलनात सोमनाथ राऊत, शिवाजी निळ, प्रकाश भोसले रूपा निंबाळकर, गणपत पाटील गणेश पाटील, भारत पाटील, बाळकृष्ण पाटील, अमोल पाटील, नितीन भोसले, दीलीप ननवरे, राम भोसले, शैलेश साठे, परिनिता शिंदे रूपाली निंबाळकर यांच्यासह कोंडी भागातील समाज बांधव सहभागी झाले होते.

मराठा समाजावर आता पर्यंत झालेले अन्याय सहन केले आता क्षमता संपली आहे. येणाऱ्या २०२४ च्या निवडणूकीमध्ये सत्ताधाऱ्यांना व समाजावर अन्याय करणाऱ्यांना मराठा समाज जागा दाखवणार

- सोमनाथ राऊत
(जिल्हाअध्यक्ष संभाजी ब्रिगेड)

**सकल मराठा समाजाचा**
**आज जिल्हाभर रास्ता रोको**

सकल मराठा समाजाच्या जिल्ह्याच्या वतीने जालना जिल्ह्यातील मराठा आंदोलकावर सरकार पुरस्कृत अमानुषपणे केलेल्या लाठी हल्ल्याच्या निषेधार्थ संपूर्ण जिल्हापर प्रत्येक तालुक्यातून जाणारे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गआज सकाळी दहा ते अकरा एक तास बंद करून सरकारच्या दडपशाहीचा निषेध केला जाणार आहे

जिल्ह्यातील मराठा समाजातील तरुणांनी रस्त्यावर उतरून आंदोलन करून सरकारचा निषेध करावा. हा सरकार पुरस्कृत भ्याड हल्ल्याचा निषेध करण्यासाठी सोलापूर शहर, करमाळा, माढा, मोहोळ, सांगोला, पंढरपूर, बार्शी, अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, या ठिकाणी हम रस्त्यावर त्या त्या तालुक्यातील लोकांनी रस्ता रोको करून सरकारचा जाहीर निषेध केला जाणार आहे.

जालना येथे आंदोलन शांततेच्या मार्गाने मराठ्यांना आरक्षण मिळावे म्हणून आमरण उपोषण करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांना पाठिंबा दर्शविण्यासाठी जमलेल्या तमाम अबाल वृद्ध, महिला, पुरुष, लहान मुले, यांच्यावर अमानुषपणे लाठी हल्ला करण्यात आला हा हल्ला पूर्वतयारी करून पोलिसांनी घडवून आणला. कारण ग्रामस्थ शांततेच्या मार्गाने आंदोलन स्थळी बसले असताना. पोलीस कर्मचारी मात्र फौज फाटा घेऊन दंगली प्रमाणे हेल्मेट व संरक्षक जाळी घेऊन आंदोलन स्थळी जातात. याचाच अर्थ पोलिसांनी जाणून-बुजून हा हल्ला केला आहे. त्याचा जाहीर निषेध समाजाच्या वतीने होत आहे. तरी सर्व मराठा व मराठा आरक्षणाला पाठिंबा दर्शवणाऱ्या तसेच सरकार विरोधी तमाम नागरिकांनी या रास्ता रोको मध्ये सामील होऊन सरकारचा निषेध करावा असे आवाहन सकल मराठा समाजाच्या वतीने केले आहे.

**चौकशी करावी**

जालना येथे आंदोलन शांततेच्या मार्गाने मराठ्यांना आरक्षण मिळावे म्हणून आमरण उपोषण करणाऱ्यावृद्ध, महिला, पुरुष, लहान मुले, यांच्यावर अमानुषपणे लाठी हल्ला करण्यात आला या घटनेचा निषेध करत जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन या प्रकरणावा एसआयटीच्या माध्यमातून चौकशी करण्याची मागणी सुनिल रसाळे, दास शेळके, विजय पुकाळे, प्रताप चव्हाण दिलीप कोल्हे यांनी केली आहे. पंढरपूर आगाराची एसटी मोहोळ जवळ आल्यानंतर एसटीवर दगडफेक करण्यात आली त्यामुळे पंढरपुर आगातील सर्व गाड्या रद्द केल्या आहेत. प्रवाशाची सुरक्षासाठी हा निर्णय घेतला असल्याचे सांगण्यात आले.

## दोषींवर कठोर कारवाईचे निर्देश : अजित पवार



**मुंबई:** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जालना जिल्ह्याच्या अंबड तालुक्यातील अंतरवली येथे आंदोलन करणाऱ्या समाजबांधवांवर पोलिसांकडून झालेला लाठीमार, हवेतील गोळीबार, बळाच्या गैरवापरासंबंधी उच्चस्तरीय चौकशीचे आणि दोषी पोलिसांवर कठोर कारवाईचे निर्देश देण्यात आले आहेत. या घटनेबाबत मराठा बांधवांसह सर्व महाराष्ट्र वासियांच्या भावना तीव्र आहेत. राज्य शासन देखील या भावनांशी सहमत असून शासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवारांनी सांगितले आहे.

ते पुढे म्हणाले की, मराठा समाजाच्या नेत्यांसोबत चर्चा करुन या प्रश्नी तोडगा काढण्याची राज्य सरकारची तयारी आहे. राज्याच्या काही भागात बसगाड्यांवर दगडफेक, जाळपोळ, हिंसाचाराच्या घटना होत असून त्या तातडीने थांबवण्याची गरज आहे. दगडफेक, जाळपोळ, हिंसाचारात आपल्या राज्याच्याच संपत्तीचे नुकसान होत आहे. या आंदोलनामुळे नागरिकांना इजा होण्याची भीती आहे. त्यामुळे दगडफेक, जाळपोळ हिंसाचार टाळला पाहिजे. आजपर्यंत शांततेच्या, लोकशाहीच्या मार्गाने सुरु असलेले आंदोलन यापुढेही त्याच मार्गाने पुढे घेऊन जाण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. राज्यात शांतता, कायदा-सुव्यवस्था कायम राहिल, यासाठी आपण सर्वांनी सहकार्य, प्रयत्न करुया, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यातील जाळपोळीच्या, हिंसाचाराच्या घटनांबद्दल चिंता व्यक्त केली आहे. ह्या घटना थांबवण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन मराठा आंदोलक नेत्यांना, कार्यकर्त्यांना त्यांनी केले आहे. राज्यातील नागरिकांनीही शांतता पाळून कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी शासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे

## पत्नीचा खून करुन पतीची आत्महत्या

सुराज्य/बार्शी

पत्नीचा खून करून पतीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना बार्शी तालुक्यातील जामगाव (आ) येथे एका वस्तीवर घडली. या दाम्पत्याच्या दीड वर्षाच्या मुलीचा रडण्याचा आवाज बाहेर आल्यानंतर दि २ रोजी सायंकाळच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. गंगाबाई धनाजी गायकवाड (वय ३५) असे पत्नीचे तर धनाजी संभाजी गायकवाड (वय ४० रा जामगाव गायरान वस्ती )असे पतीचे नाव आहे.

२ रोजी सायंकाळच्या सुमारास घरातून दीड वर्षाच्या मुलीच्या रडण्याचा आवाज लोकांना आला. लोकांनी घराचा कडी तोडून दरवाजा उघडून पाहिला असता धनाजी हा गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आला तर त्याची गंगाबाई हिच्या डोक्यात गंभीर जखम झालेली व मयत अवस्थेत दिसून आली. नागरिकांनी याबाबत पोलीस स्टेशनला कल्पना दिली. पो. नि. मांजरे व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली. धनाजीने पत्नीच्या डोक्यात मारून तिचा खून केल्याचे व नंतर स्वतःही गळफास घेतल्याच्या निष्कर्षास पोलीस आले.

## पुण्यात पावसाचे पुनरागमन, पिंपरी चिंचवडलाही झोडपले

### पवना धरण १०० टक्के, उजनीच्या आशा पल्लवित

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

पुणे आणि परिसरात शुक्रवारी रात्री बारा वाजल्यापासून संततधार पाऊस सुरू झाला आहे तसेच पिंपरी-चिंचवडला मुसळधार पावसाने झोडपून काढले. सर्वाधिक ८३.५ मिलिमीटर पावसाची नोंद पिंपरी चिंचवडमध्ये झाली आहे. पुण्यासह पिंपरी-चिंचवडमध्ये पावसाचे पुनरागमन झाल्याने सोलापूर जिल्ह्याची वरदायिनी असलेल्या उजनी धरणातील पाणी साठ्यात वाढ होण्याच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

दरम्यान सोलापुरातही मंगळवारी वरूणराजाचे पुनश्च आगमन होईल,असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

मोसमी पावसाच्या यंदाच्या हंगामात म्हणजे जूनपासून ऑगस्टअखेर पुण्याला संततधार पावसाने हुलकावणी दिली होती.

रात्री साधारण बारानंतर सुरू झालेला संततधार पाऊस सकाळी दहा वाजेपर्यंत सुरूच होता. या काळात सर्वाधिक पाऊस पावसाची नोंद पिंपरी चिंचवड परिसरात झाली असून, ८३.५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.

**पवना धरण १०० टक्के भरले; १४०० क्यूसेकचा विसर्ग**

मावळसह पिंपरी-चिंचवड शहर परिसरात जोरदार पाऊस पडला आहे. पवना धरण १०० टक्के भरले असून धरणातून १४०० क्यूसेक्सने विसर्ग करण्यात येणार आहे. त्यामुळे नदी काठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.पवना धरणातून पाणी सोडल्याने त्याचा लाभ उजनीला होणार आहे.

## मुसळधार पावसाने मंगळवेढ्याला झोडपले

सुराज्य/सोलापूर

शनिवार, २ सप्टेंबर रोजी मंगळवेढा तालुक्यातील काही गावात मुसळधार पाऊस झाला. अनेक शेतकऱ्यांच्या शेतात पाणी साचले होते.

संपूर्ण जुलै महिन्यामध्ये पावसाने हजेरी लावली मात्र ऑगस्ट महिना पाऊस पडला नाही. उडीद, मूग, सोयाबीन, तूर या सर्व खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. आता परतीच्या पावसाला सुरुवात झाली आहे. संपूर्ण एक महिन्याच्या प्रतीक्षेनंतर मंगळवेढा तालुक्यातील बोराळे भागात ढगफुटी सारखा पाऊस झाला आहे. शेतातून कंबरे एवढे पाणी वाहत असल्याचे चित्र दिसून येते. पावसाचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याचे दिसून आले.






## तिसरा डोळा

- प्रकाश पोरे




लोडशेडींगमुळे निसर्गाचा चमत्कार जास्त जाणवतो !

कल्याण
790-60-578

## जिल्ह्यात १४ गावांना टँकरने पाणीपुरवठा सुरू

सुराज्य/सोलापूर




ग्रामीण भागात पाण्याची नुकतीच टंचाई सुरू झाली असून जिल्ह्यातील १४ गावांमध्ये सध्या १२ टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे .यापूर्वी माळशिरस तालुक्यातील ८ गावात व सांगोला तालुक्यातील पाच गावात सहा टँकरने पाणीपुरवठा सुरू होता. आता माढा तालुक्यातील तुळशी गावातही टँकरने पाणीपुरवठा सुरू झाल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

पावसाने ओढ दिल्याने अनेक गावांमध्ये पाणीटंचाई निर्माण झाली आहे. चार दिवसांपूर्वी १२ गावात १३ टँकरने पाणीपुरवठा सुरू होता. आता माळशिरस तालुक्यातील बचेरी, मगरवाडी, गारवाड, हिरोली, सुळेवाडी , भांब ,निटकेवाडी, पिंपरी, या गावात ही टँकरने पाणीपुरवठा सुरू झाला आहे . तसेच जळभावी, लोंढे, मोहितेवाडी, फडतरी , आधी गावामध्ये पाणीपुरवठा सुरू होता . परंतु या ठिकाणी चार दिवसांपूर्वी पुरेसा पाऊस झाला असून सध्या तेथील टँकर बंद झाला आहे . सांगोला तालुक्यातील डोंगरगाव, वासरे, तसेच अजनाळे, गावात टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. अजनाळे गावात दोन टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. आता माढा तालुक्यातील तुळशी गावातही टँकरने पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. जिल्ह्यात अशी एकंदरीत परिस्थिती असली तरी अनेक गावांना पाण्याचा प्रश्न भेडसावत आहे परंतु नळ पाणीपुरवठा योजनेने चार-पाच दिवसाआड तरी पाणी नक्कीच मिळत असल्याने पाण्याची कमतरता कमी जाणवत आहे. मात्र पावसाची भविष्यात अशीच परिस्थिती राहिली तर लवकरच जिल्ह्यातील अनेक गावांना टँकरने पाणीपुरवठा करावा लागणार असल्याची माहिती पाणी पुरवठा विभागाकडून देण्यात आली आहे. त्या करिता पाणीपुरवठा सज्ज असल्याचेही सांगण्यात आले आहे.

# पोलिसांवर झालेल्या दगडफेकप्रकरणी ३५० जणांवर गुन्हा दाखल

## जालना लाठीचार्ज मराठा आरक्षण आंदोलन
## राज्यभर पडसाद ▶▶ जिल्ह्यात आज रास्ता रोको

सुराज्य/सोलापूर

**मराठा आरक्षणाच्या जटील प्रश्नावरुन जालना जिल्ह्यातील सराटी येथे सुरु असलेल्य आंदोलनाचा काल शुक्रवारी भडका उडाला. पोलिसांनी केलेल्या लाठीचार्जमुळे या आंदोलनाला हिंसक वळण लागले. याचे पडसाद संबंध राज्यभर उमटले आहे. दुसऱ्या दिवशी शनिवारी राज्यात ठिकठिकाणी बंद, मोर्चे, निषेध, मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांचे पोस्टर जाळणे, फाडणे असे प्रकार घडले. दरम्यान मराठा आरक्षणासाठी आंतरवाली सराटी येथे उपोषण सुरू असताना जमलेल्या गर्दीच्या ठिकाणी पोलिसांवर झालेल्या दगडफेकप्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. १६ जणांसह अन्य ३०० ते ३५० नावे माहीत नसलेल्या आंदोलनकर्त्यांविरुद्ध गोंदी पोलिसांनी हा गुन्हा नोंदविला आहे. दरम्यान या आंदोलनाचे पडसाद सोलापूर जिल्ह्यातही उमटले असून मराठा समाजबांधवांनी संबंधी जिल्हाभर रविवारी रास्ता रोको आंदोलन करण्याचे नियोजन केले आहे.**

मराठा आरक्षणाच्या आंदोलनाचे पडसाद शनिवार संबंध महाराष्ट्रभर उमटले. धुळे-सोलापूर महामार्गावर दोन बस पेटवण्यात आल्या, नगर जिल्ह्यातील अकोले येथे कडकडीत बंद पाळण्यात आला, सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर येथे निषेध आंदोलन करण्यात आले, नांदेड जिल्ह्यातील पाडूर येथे बंद पाळण्यात आला, सोलापुरात मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या पोस्टरला जोडो मारो आंदोलन करण्यात आले, मोहोळमध्ये गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पुतळा जाळण्यात आला. संभाजीनगरगला सोलापूरकडे येणारी एसटी बस जाळण्यात आली. जालना जिल्ह्यातील फुलंब्री येथे युवकाची निषेध म्हणून स्वत:ची कार पेटवून दिली.

जालना जिल्ह्यातील अंतरवली सराटी येथे मनोज जरांगे व आपल्या कार्यकर्त्यांसह मराठा आरक्षणासाठी गेल्या तीन दिवसापासून उपोषणास बसले असताना प्रकृती खालावल्याने त्यांना उपचाराची आवश्यकता असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सुचविले होते. त्यामुळे त्यांना समजावून सांगण्यासाठी पोलीस अधिकारी गेले होते. परंतु आरक्षण मिळाल्याशिवाय जरंगे यांना उपोषण सोडू देणार नाही असे सांगून आंदोलनकर्त्यांनी पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार आणि महसूल अधिकाऱ्यांशी हुज्जत घातली. पोलीस आणि दंडाधिकारी यांनी दिलेल्या कायदेशीर सूचनांचे पालन केले नाही. पोलिसांवर दगडफेक व प्राणघातक हल्ला करून त्यांना गंभीर जखमी केले. तसेच पोलिसांच्या वाहनांवर दगडफेक केली तसेच त्यांचे खासगी वाहन पेटवून नुकसान केले, असे या संदर्भात दाखल केलेल्या फिर्यादित म्हटले आहे. आंदोलनस्थळी पोलीस मोठ्या फौजफाटा घेऊन आले, यामुळेच हे आंदोलन चिघळले, असा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे.



दरम्यान, शनिवारी सकाळी छत्रपती संभाजीराजे यांनी आंतरवाली सराटी गावात जाऊन मनोज जरांगे आणि आंदोलनकर्त्यांची भेट घेतली. यावेळी उपस्थितांच्या समोर बोलताना ते म्हणाले, हे काय सुराज्य आहे? हे तर मोगल आणि निजामाचे राज्य आहे. १२ वर्षांपूर्वी मी म्हणालो होतो, मराठ्यांवर गोळ्या घालायच्या असेल तर अगोदर माझ्यावर घाला. गोळ्या घालायला आंदोलनकर्ते काय पाकिस्तानी किंवा आतंकवादी आहेत? गुन्हे दाखल कशासाठी करता? दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घ्या. लाठीमार आणि गोळीबार करण्याचे आदेश देणाऱ्यांचे निलंबन झाल्याशिवाय गप्प बसणार नाही. गृहमंत्री म्हणतात, पोलिसांची चूक नाही. मग गोळ्या झाडणे बरोबर आहे का? हे देवेंद्र फडणवीस यांनी सांगावे. लाठीमार आणि गोळीबाराची कृती अमानुषीय असून या प्रकरणी स्पष्टीकरण मिळाले पाहिजे. कशा पद्धतीने मराठा समाजास आरक्षण देता हे सांगा. माझ्यासाठी समाजकारण प्रथम आणि राजकारण दुय्यम आहे. दिल्ली आणि महाराष्ट्रात एकाच पक्षाच्या नेतृत्वाखालील सरकार आहे. वर आणि खाली आपलेच सरकार आहे तर मग मराठा समाजास आरक्षण कधी मिळणार हे सांगा, असा सवाल छत्रपती संभाजीराजे यांनी सत्ताधाऱ्यांना उद्देशून केला.

दरम्यान राष्ट्रवादीचे (शरद पवार) आमदार रोहित पवार यांनी आंदोलनाच्या ठिकाणी भेट दिली. ते म्हणाले, आंदोलनकर्त्यांना पाठिंबा देण्यासाठी इतर गावांतून लोक येत होते. शांततेत चाललेले उपोषण मोडीत काढण्याचा प्रयत्न पोलिसांकडून झाला. पोलिसांच्या लाठीमारात महिला, पुरुष व लहान मुले जखमी झाले. आंदोलन करणाऱ्यांवर बळाचा वापर करणे योग्य नाही. पोलिसांनी या प्रकरणी उगीचच अंधाधुंद गुन्हे दाखल करू नयेत. प्रशासन आणि पोलिसांमुळे हे प्रकरण चिघळले आहे. ही घटना माणुसकीला शोभणारी नाही. जालना येथे येत्या ८ सप्टेंबर रोजी राज्य शासनाचा 'शासन आपल्या दारी' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमास मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री येणार असल्याने प्रतिसाद मिळणाऱ्या या आंदोलनाचा त्यावर प्रभाव पडला असता किंवा अडचण आली असती, असेही सांगितले जात आहे.

आंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्यांवर झालेला बळाचा वापर खालच्या पातळीवरील पोलीस करतील, असे वाटत नाही. वरच्या संदेशाशिवाय असा निर्णय घेतला जात नाही. बळाचा वापर करण्यासाठी गृहमंत्रालयाचा आदेश आला असावा, अशी शक्यताही रोहित पवार यांनी यावेळी व्यक्त केली.

### मुंबईतून आदेश आल्यानेच लाठीमार : शरद पवार

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, आमदार राजेश टोपे यांनी मराठा आंदोलकांची अंबड रुग्णालयात आणि अंतरवाली सराटी गावात मनोज जरांगे पाटील यांची भेट दिली. बळाचा वापर या ठिकाणी केला गेला, असं शरद पवार म्हणाले. मुंबईवरुन आदेश आल्यानंतर पोलिसांचा दृष्टिकोन बदलला आणि त्यानंतर बळाचा वापर करण्यात आला, असं आंदोलकांनी सांगितल्याचं शरद पवार म्हणाले.

### त्यांना आंदोलनाची कल्पना नव्हती का? : उध्दव ठाकरे

शिवसेना (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शिंदे-फडणवीस आणि पवार सरकारवर हल्लाबोल केला आहे. याचा फक्त निषेध करून चालणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने सरकारवरती ताशेरे मारले आहेत. सरकार म्हणजे नेमकं कोण? पाहिलं तर 'एक फुल, दोन हाफ' आहेत. त्यांना या आंदोलनाची कल्पना नव्हती काय?. असा सवाल ठाकरे यांनी केला आहे.

### सहनशीलतेचा अंत पाहू नका : उदयनराजे

राज्यातील मराठा नेते लाठीचार्ज झालेल्यांची विचारपूस करण्यासाठी सराटी गावात जात आहेत. यातच उदयनराजे भोसले यांनीसुद्धा सराटी गावाला भेट दिली असून, त्यांनी यावेळी मराठ्यांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नका असा इशारा द्या. उदयनराजे भोसले यांनी दिला आहे.



**सरपंचाने जाळली कार**

या आंदोलनाचा भडका उडाला असून, एका सरपंचाने निषेध नोंदविण्यासाठी चक्क स्वत:कडील नवी कोरी कारच जाळून टाकली आहे. तेव्हा आता हे आंदोलन राज्यभर पेटण्याची चिन्हे आहेत. गेवराई पायगाचे सरपंच मंगेश साबळे यांनी वेगळ्या पद्धतीने या घटनेचा निषेध व्यक्त केला आहे.

शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड म्हणाले, आज विरोधी पक्ष आमच्यावर टीका करतोय, परंतु वर्षभराआधी हेच लोक सरकारमध्ये होते. त्यांच्या काळात अशा प्रकारच्या ज्या घटना घडल्या तेव्हा यांनी पोलिसांना आदेश दिले होते का? अशा कुठल्याही घटनेत मुख्यमंत्री किंवा गृहमंत्री अशा प्रकारचे आदेश देत नाहीत. तो तिथल्या एखाद्या अधिकाऱ्याचा विक्षिप्तपणा असू शकतो. त्याची चौकशी होईल आणि दोषी अधिकाऱ्यावर कारवाई होईल. सरकार त्याच्यावर कारवाई करेल.

### इथे सरकारचे चुकलेच : राज ठाकरे

जालन्यात घडलेल्या घटनेबद्दल राज ठाकरे यांनी त्यांच्या सोशल मीडियावर या घटनेशी संबंधित पत्र लिहिले आहे. यामध्ये त्यांनी जालन्यातील घटनेवर संताप व्यक्त करत याठिकाणी सरकारचे चुकल्याचे म्हटले आहे. त्याशिवाय त्यांनी मराठा समाजातील बांधवांना शांतता राखण्याचे देखील आवाहन केले आहे.



## समर्थनगर ग्रामपंचायतच्यावतीने अमृत महोत्सव सांगता समारोप

**अक्कलकोट** : येथील समर्थनगर ग्रामपंचायतीच्यावतीने अमृत महोत्सव सांगता समारोप दररोज विविध देशभक्तीपर कार्यक्रम घेऊन साजरा करण्यात आला. १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२३ पर्यंत दररोज सर्वसामान्य माणसांच्या मनात देश भावना जागृत करण्यासाठी समर्थनगर ग्रामपंचायतीच्या वतीने मेरी मिट्टी मेरा देश या अभियानांतर्गत मिट्टी को नमन, विरों को वंदन, हर घर तिरंगा प्रसार व प्रचार, ध्वजारोहण, राष्ट्रगीत, शीला अनावरण, आजी-माजी सैनिकांचा सन्मान,पंचप्रण शपथ,वृक्षारोपण आदी राष्ट्रीय कार्यक्रम घेऊन अमृत महोत्सव सांगता समारोप उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी 'एक कुटुंब एक वृक्ष' या अभियानांतर्गत ग्रामपंचायतीच्या वतीने प्रत्येक कुटुंबाला रोपांचे वाटप करण्यात आले. यावेळी सरपंच जयश्री मल्लीनाथ पाटील, उपसरपंच लालसिंग राठोड, ग्रामविकास अधिकारी प्रेमदास पवार आदी उपस्थित होते.



## डी. जी. मार्ट मॉलचे पूजन

**नातेपुते** : नातेपुते येथे डी. जी. मार्ट मॉलच्या दुसऱ्या वर्धापन दिनानिमित्त माळशिरस तालुका शिवसेनाप्रमुख राजकुमार हिवरकर पाटील व एस. एन. डी. इंटरनॅशनल स्कूलचे सेक्रेटरी रोहित शेटे यांच्या हस्ते पूजन करून श्रीफळ वाढवण्यात आले.

आतापर्यंत मॉलमध्ये ग्राहकांनी केलेल्या खरेदीवर ज्या ग्राहकांनी १ हजार पॉइंट केले अशा ग्राहकांना एक मिनिट या वेळात मॉल मधील कोणतीही वस्तू घेऊन काउंटरपर्यंत आल्यानंतर तो गोळा केलेला सर्व माल ग्राहकांना डी. जी. मार्ट यांच्यावतीने बक्षीस स्वरूपात मोफत देण्यात आला. यामध्ये चंपा पटेल यांनी ८ हजार ४९ रुपयांचा व प्रभा पटेल यांनी ६ हजार २३० रूपयेचा तर डॉ. विवेक महामुनी यांनी ४ हजार ५६० रुपयेचा माल डी. जी. मार्टमधून बक्षीस स्वरूपात मोफत मिळविला.

मिळवलेला मॉलमधील मॉल राजकुमार हिवरकर पाटील व रोहित शेटे मॉलचे संस्थापक दर्शन गांधी, संचालिका दिव्यश्री गांधी, दिलीप गांधी, दीपा गांधी यांच्या हस्ते ग्राहकांना देण्यात आला. प्रास्ताविक संचालिका दिव्यश्री गांधी यांनी केल्या असून आभार दीपा गांधी यांनी मानले.

## तरुणांनी नोकरी करणारे ऐवजी नोकरी देणारे बनावे : डॉ. मिणियार

### ▶▶ उद्योजकता विकास यात्रेचा थाटात समारोप

सुराज्य/सोलापूर

उद्योजकता हा भारतीयांचा मूळ स्वभाव आहे. गेल्या काही दशकांमध्ये भारतीयांना याचा विसर पडला होता. मात्र आता तरुणांनी नोकरी करणारे ऐवजी नोकरी देणारे बनावे, असे प्रतिपादन उद्योजक व शिक्षण तज्ज्ञ डॉ. रवींद्र मिणीयार यांनी केले. स्वावलंबी भारत अभियान आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उद्योजकता विकास यात्रेचा समारोप शनिवारी विद्यापीठात थाटात झाला.



यावेळी उद्योजक व शिक्षण तज्ज्ञ डॉ. रवींद्र मिणीयार, सोलापूर विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रा. डॉ. गौतम कांबळे, प्रमुख पाहुणे लीड बँक मॅनेजर प्रशांत नाशिककर, सेवा भारतीच्या राष्ट्रीय सचिवा चंद्रिका चौहान, विद्यापीठाच्या कुलसचिव योगिनी घारे, नवोपक्रम नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. सचिन लड्डा, सेवावर्धीनीचे प्रकल्प अधिकारी चन्नवीर बंकुर, स्वावलंबी भारत अभियानाचे जिल्हा समन्वयक विनायक बंकापूर, तंत्रशिक्षण विद्यार्थी परिषदेचे प्रांत संयोजक सचिन पारवे उपस्थित होते. डॉ. रवींद्र मिणीयार यांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि प्रतिमापूजन करून कार्यक्रमाचे उद्घाटन झाले.

डॉ. मिणीयार म्हणाले, 'या उद्योजकता विकास यात्रेतून तब्बल ७ हजार उद्योजकांशी संपर्क झाला ही कौतुकाची बाब आहे. तरुणांनी केवळ नोकरीच्या मागे न लागता उद्योजकतेची कास धरावी, असेही डॉ. मिणीयार यांनी सांगितले. विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. गौतम कांबळे म्हणाले, व्यवसाय उद्योग करण्याची आवड तरुणांमध्ये निर्माण होण्यासाठी उद्योजकता विकास यात्रेचा खूप चांगला परिणाम होणार आहे. विकसनशील भारतीय अर्थव्यवस्थेला विकसित अर्थव्यवस्थेमध्ये परावर्तित करणे आवश्यक आहे. त्याकरिता भारतातील खेड्यांचा विकास झाला पाहिजे, असे मतही प्र. कुलगुरू डॉ. गौतम कांबळे यांनी मांडले.

नवोपक्रम नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. सचिन लड्डा यांनी प्रास्ताविक केले. प्रभाकर जमखंडीकर यांनी सूत्रसंचालन तर दीपक तरंगे यांनी आभार केले.

याप्रसंगी आदित्य मस्के, ओम इंगळे, मदन कुलकर्णी, ज्ञानेश्वर जाधव, प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा आणि विद्यापीठाचे विद्यार्थी, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

## थकीत ऊस बिलासाठी 'जनशक्ती'चे 'भीक मांगो आंदोलन'

सुराज्य/सोलापूर

ऊस कारखान्यांचा गळीत हंगाम संपून ५ महिने झाले आहेत आणि आज दुसऱ्या हंगामाची तयारी सुरु होण्याच्या मार्गावर आहे. परंतु आजतागायत मकाई सहकारी साखर कारखाना भिलारवाडी, कमलाई साखर कारखाना करमाळा, कर्मयोगी साखर कारखाना इंदापूर व ऊस बिल थकवलेले सर्वच साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांची थकीत ऊस बिले ऊस उत्पादकांना दिलेली नाहीत. हजारो शेतकऱ्यांवर बोगस कर्ज काढली आहेत.

संबंधित साखर कारखान्यांनी दि. ५ सप्टेंबर २०२३ पर्यंत जर शेतकऱ्यांची ऊस बिले अदा केली नाहीत तर जनशक्ती संघटनेच्यावतीने साखर आयुक्त, साखर संकुल पुणे यांचे दालनासमोर मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचा मोर्चा नेऊन भीक मागो आंदोलन करण्यात येईल असा इशारा जनशक्ती संघटनेचे संस्थापक अतुल खूपसे पाटील यांनी एका निवेदनाद्वारे दिला.

या निवेदनात पुढील म्हटले आहे की, 'शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने उसाचे पीक घेतले, जवळपास दीड वर्ष या उसाची काळजी घेतली. कारखान्याला ऊस घालवला. मात्र आज पाच ते सहा महिने होऊन गेले तरी उसाची बिले अद्याप शेतकऱ्यांना मिळाले नाहीत. एकीकडे दुष्काळाने तोंड वर काढले आहे तर दुसरीकडे कारखानदार शेतकऱ्यांच्या पोटावर मारत आहे. त्यामुळे संघटनेच्या वतीने साखर संकुल येथे हजारो शेतकऱ्यांसहित भिक मांगो आंदोलन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## बेणारे व गायकवाड यांची स्केटिंग स्पर्धेसाठी निवड

सुराज्य/बार्शी

जिल्हास्तरीय स्केटिंग स्पर्धेमध्ये यश संपादन करत महाराष्ट्र विदयालयाच्या हर्ष बेणारे व रेणुका गायकवाड या खेळाडूंची शालेय विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. तसेच तालुकास्तरीय बुध्दीबळ स्पर्धेतून विदयालयाच्या १० खेळाडूंची जिल्हा स्पर्धेसाठी निवड झाली.

सुलाखे इंग्लिश मीडियम स्कूल बार्शी येथे १४, १७ व १९ वयोगटातील मुले व मुलींच्या शालेय तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धांमध्ये तालुक्यातील २४८ खेळाडूंनी सहभाग घेतला.

या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र विद्यालयाच्या १४ वयोगट मुलींमध्ये चौथा क्रमांक वेदिका घोळवे तर पाचवा क्रमांक सृष्टी पाटील, वयोगट १४ मुलांमध्ये दुसरा क्रमांक प्रज्ज्वल शिंदे तर तिसरा क्रमांक उदयानंद दळवी, वयोगट १७ मुलांमध्ये प्रथम क्रमांक प्रसन्न जगदाळे तर चौथा क्रमांक समर्थ नवले, वयोगट १९ मुलींमध्ये चौथा क्रमांक समृद्धी कुलकर्णी व वयोगट १९ मुलांमध्ये द्वितीय क्रमांक अनिकेत दळवी, तृतीय क्रमांक वेदांत मस्के तर चौथा क्रमांक वेदांत खोसे या एकूण १० खेळाडूंची जिल्हा स्पर्धेसाठी निवड झाली.

## पद्मश्री विखे-पाटील यांचे सहकारातील योगदान अजरामर : राजनाथसिंह

### सोलापूरचे प्रा. निशिकांत ठकार जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित

सुराज्य/नगर

पद्मश्री विठ्ठलराव विखे-पाटील यांनी शेतकऱ्यांमध्ये चेतना जागविण्याचे काम केले. सहकारातून त्यांनी शेतकऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. सहकार, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रातील त्यांचे योगदान राज्य आणि देश विसरणार नाही, असे गौरवोद्गार केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी काढले.

पद्मश्री विठ्ठलराव विखे यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त प्रवरानगर येथे ३३ व्या साहित्य पुरस्कारांचे वितरण सिंह यांच्या हस्ते झाले.



यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष रवींद्र शोभणे आदी उपस्थित होते.

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते बुधवारी प्रवरानगर (जि. अहमदनगर) येथे पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील साहित्य सेवा जीवन गौरव पुरस्कार सोलापूर येथील साहित्यिक डॉ. निशिकांत ठकार यांना प्रदान करण्यात आला. समवेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, चंद्रशेखर बावनकुळे, खासदार डॉ. सुजय विखे पाटील. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. रावसाहेब कसबे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रा. निशिकांत ठकार यांना देण्यात आलेल्या पुरस्कारात पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील साहित्य जीवनगौरव पुरस्कार एक लाख आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. निशिकांत ठकार हे हिंदीतले वाङ्मय मराठीत आणणारे महत्वाचे अनुवादक आहेत. ते सोलापूरच्या वालचंद कॉलेजमधून निवृत्त झाले आहेत. त्यांचे पंचवीसहून अधिक ग्रंथ प्रकाशित झाले आहेत असे डॉ. रावसाहेब कसबे यांनी सांगितले.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.



## खंडाळीच्या मुलांची अनोखी परिसर भेट

**वेळापूर** : श्रावण महिन्यानिमित्त जि.प .प्राथमीक शाळा खंडाळीच्या मुलांनी एक वेगळी परिसर भेट अनुभवली. दप्तरा विना शाळा उपक्रमांतर्गत शनिवारी परिसरभेट हा उपक्रम घेतला. शाळेच्या जवळच असलेल्या काशीविश्वेश्वर मंदिराच्या परिसराला इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी व सर्व शिक्षकांनी भेट दिली. ही परिसरभेट खूपच अविस्मरणीय व अनोखी ठरली. मंदिराच्या परिसरात प्रवेश करताच परिसर अस्वच्छ दिसला. तेव्हा प्रथम सर्व शिक्षक आणि मुलांनी मिळून परिसर झाडून, प्लास्टिक गोळा करून स्वच्छ केला. नंतर विश्वेश्वराचे दर्शन घेऊन, गाणे, गोष्टी, मनोरंजनात्मक खेळ, विविध स्पर्धा, कृती गीते इत्यादीचा आनंद घेतला.



## रोटरी ई क्लबतर्फे आदर्श शिक्षक पुरस्कारांचे वितरण

**सोलापूर** : रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर इलाईटतर्फे शिक्षक दिनाच्या पार्श्वभूमीवर आदर्श शिक्षक पुरस्कारांचे वितरण रंगभवन येथील मेसॉनिक हॉलमध्ये करण्यात आले. शिक्षक ही समाजाची सर्वकालिक गरज आहे. शिक्षक समाजाचे जीवनमान उंचावण्याचे कार्य करतात, असे प्रतिपादन व्याख्याते प्रभाकर जमखंडीकर यांनी केले. याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे सी. ए. राजेश पटवर्धन, व्याख्याते प्रभाकर जमखंडीकर, रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर इलाईटचे अध्यक्ष व्यंकटेश सोमाणी, सचिव संदीप कुलकर्णी उपस्थित होते. यावेळभ रवींद्र देशमुख, दत्तात्रय तांबे, अनंत अल्लीशे, गंगाधर खानापुरे आणि मंजुषा रोकडे या शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. शाल, सन्मानचिन्ह आणि नॅपकिन बुके असे पुरस्काराचे स्वरूप होते. अध्यक्ष व्यंकटेश सोमाणी यांनी प्रास्ताविक केले. सचिव संदीप कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन केले.



## वेळापूर पालखी मैदान येथे वृक्षारोपण

**वेळापूर** : वेळापुर येथे एमआयटी टेक्नॉलॉजी युनिव्हर्सिटी पुणे यांच्यावतीने मोहीम कल्पवृक्षाची वाट पंढरीची या उपक्रमा अंतर्गत वेळापूर पालखी मैदान येथे वेळापूर ग्रामपंचायतचे सरपंच रजनीश बनसोडे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे आणि वेळापूर ग्रामपंचायतीचे कर्मचारी व झाडांचे पालन करते सयाजी पवार यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी चंद्रकांत पोळ व संस्थेचे अधिकारी उपस्थित होते.

## बार्शीतील शिबिरात जिल्हा बँकेच्या कर्मचाऱ्यांची तपासणी

**बार्शी** : लायन्स क्लब बार्शी रॉयल, माधवबाग आयुर्वेद कार्डीयाक क्लिनिक बार्शी व शिल्पा डेंटल क्लिनिक अँड इम्प्लांट सेंटर बार्शी आयोजित डीसीसी बँक मधील कर्मचाऱ्यांसाठी मधुमेह, हृदयरोग आणि दंतआरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. सुमारे १०० कर्मचाऱ्यांनी याचा लाभ घेतला. शिबीरात रक्तदाब, शुगर, बीएमआय, दंत आरोग्य तपासणी व डॉक्टरांचा सल्ला देण्यात आला. तसेच ईसीजी आवश्यकतेनुसार माधवबाग बार्शी शाखेमध्ये करण्यात येणार आहे. उपस्थितांना मार्गदर्शन करण्याकरिता माधवबागच्या डॉ. क्रांती कोळी व शिल्पा डेंटल क्लिनिकचे डॉ.तेजस लाड उपस्थित होते. कार्यक्रमासाठी बँकेचे अधिकारी श्री.गाढवे, शाखाधिकारी राहुल खुने कर्मचारी उपस्थित होते. लायन्स क्लब बार्शी रॉयलचे अध्यक्ष राजेश खाडे, सचिव मनीष रुगले, खजिनदार शशिकांत बारबोले व सर्व सदस्य यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

# मराठा बांधवांवर झालेल्या हल्ल्याचा अक्कलकोटमध्ये निषेध

## अक्कलकोट ते सोलापूर रस्त्यावर रास्ता रोको

**सुराज्य/अक्कलकोट**

सकल मराठा समाज, मराठा संघटन अक्कलकोट शहर तालुक्याच्या वतीने जालना यीथ्रे ठिकाणी पोलिसांनी आंदोलन कार्त्यावर केलेल्या अमानुष लाठी हल्ला व गोळीबार करून मराठा समाजावर हल्ला केल्याबद्दल अक्कलकोट ते सोलापूर रस्त्यावर रास्ता रोको करून तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. या प्रसंगी तहसीलदार बाळासाहेब सिरसट यांना लेखी निवेदन देण्यात आले. यावेळी उत्तर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक जितेंद्र कोळी हे उपस्थित होते.

दरम्यान रास्ता रोको मुळे दुतर्फा वाहनाची रांग लागलेली होती या चक्का जाम आंदोलनात मराठा समाज शेकडोच्या संख्येने उपस्थित होता. आंदोलन चिरडून काढण्यासाठी समाजातील महिला, लहान मुले, वृद्ध व तरुणांवर लाठी हल्ला व गोळीबार केल्याचा अक्कलकोट ते सोलापूर रस्त्यावर रास्ता रोको करून तीव्र निषेध व्यक्त करण्यात आले.

या वेळी आंदोलन कर्त्यांची माजी राज्य मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, अशपाकभाई बळ्ळोरगी, मल्लिकार्जुन पाटील यांनी भेट



घेतली. या आंदोलनाच्या वेळी सुरेशचंद्र सूर्यवंशी, अमोलराजे भोसले, महेश इंगळे, बाबासाहेब निंबाळकर, मनोज निकम, गोटू माने, बाळासाहेब मोरे, तम्मा शेळके, राजाभाऊ नवले, शितल जाधव, रवी कदम, प्रवीण घाडगे, वैभव मोरे, अतिश पवार, योगेश पवार, बालाजी पाटील, मारुतीराव बावडे, मनोज इंगुले, निखिल पाटील, देवानंद काजळे, ज्ञानेश्वर भोसले, काशिनाथ कदम, आकाश शिंदे, गणेश पाटील, महेश दणके, गोविंदराव शिंदे, प्रथमेश पवार, मनोज गंगणे, मंगेश फुटाणे, सुरेश कदम, स्वामीराव मोरे, प्रशांत भगरे, स्वामिनाथ बाबर, नागराज पाटील, आकाश सुर्यवंशी, रवी पोळ, विनायक भोसले, ओंकार देशमुख, शरद भोसले, लक्ष्मण शिंदे, राजाराम पवार, अमर शिंदे, प्रसाद मोरे, अजय शिंदे, रावसाहेब मोरे, सिध्दाराम माळी, फहीम पिरजादे, अभिषेक चव्हाण, दत्ता मोरे, दत्ता माने, विशाल घाडगे, धनंजय निंबाळकर, शुभम कामनुरकर, शुभम सावंत, शुभम चव्हाण, विकी गडदे, ओंकार दुरुगकर, विशाल कलबुर्गी, राज जोजन, अक्षय पवार, राहूल शिंदे, निखिल शिंदे, श्रीशैल कुंभार, महेश निंबोळे, शरद पवार, अमित कोळी, अंकुश मोरे, गीत पवार, अनंत पवार, अंबादास शिंदे, सुमित कल्याणी, विष्णू गुमटे आदी उपस्थित होते.

## माढा मतदारसंघासाठी तीर्थविकास व पर्यटनसाठी साडेचार कोटी द्या : आ. रणजितसिंहांची मागणी

**सुराज्य/सोलापूर**

माढा विधानसभा मतदारसंघातील पंढरपूर, माळशिरस, माढा, या तालुक्यातील तीर्थविकास व पर्यटनासाठी आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ४.५० कोटी रूपयांची मागणी केली.



माळशिरस तालुक्यातील वाघोली, नेवरे, जांभूड,माळखांबी पंढरपूर तालुक्यातील शेवते,नारायण चिंचोली,भैरवनाथवाडी उंबरे पागे,करकंब,पटवर्धन कुरोली, खेडभोसे, जळोली,अर्जुनसोंड,माढा तालुक्यातील शिराळ (टें),मानेगांव,टेंभुर्णी,भुताष्टे,लऊळ,अकोले खुर्द,सुर्ली फुटजवळगाव,रांझणी,उंदरगाव,केवड, दारफळ सीना,अंजनगांव(खे),माळेगाव,बावी,आढेगांव, मोडनिंब,गारअकोले, माढा. या माढा विधानसभा मतदारसंघातील पंढरपूर, माळशिरस माढा तालुक्यातील या गावांमध्ये पर्यटन व तीर्थविकास साठी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ४.५० कोटी रूपयांचा निधी उपलब्ध व्हावा अशी मागणी केली यावर उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यवाही करून प्रस्तावित कामे मार्गी लावण्याचे सूचना दिल्या..

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून व आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या प्रयत्नातून माढा विधानसभा मतदारसंघात रस्ते विकासाकरिता १३ कोटी रूपये तसेच तीर्थविकास व पर्यटनाची कामे लवकरच मार्गी लागणार आहेत.

# पाणी चंटाईवर मात करण्यासाठी सांगोल्यात तयारी

## चांडोलेवाडी नजीक बंधाऱ्यात पाणी सोडणार

**सुराज्य/सांगोला**

सांगोला शहर व ८१ गावची शिरभावी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना पाण्याअभावी बंद पडली आहे. त्यामुळे उजनीतून भीमा नदीत पाणी सोडून शिरभावी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना व सांगोला शहराची योजना कार्यान्वित होईपर्यंत टँकरने पाणीपुरवठा करावा अशी मागणी होत आहे

पंढरपूर येथील इसबावी बंधाऱ्यातील उपलब्ध पाणीसाठा संपुष्टात येऊ लागल्याने सांगोला शहरासह शिरभावी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना ठप्प झाली आहे. सांगोला शहरासह वाड्यावस्त्यांवर संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी सांगोला नगरपरिषदेकडून नीरा उजव्या कालव्यातंर्गत सांगोला शाखा -५ मधून चांडोले वाडी नजीक बंधाऱ्यात पाणी सोडून तो भरून घेतला जाणार आहे.

या बंधाऱ्याजवळ पाणीपुरवठ्याची विहीर आहे. त्या विहिरीतून पंपिंग करून चांडोलेवाडी योजनेतून सप्टेंबर महिन्यात पुढील २० ते २५ दिवस शहराला पाणीपुरवठा होईल असे त्या दृष्टीने नियोजन सुरू केले आहे. पुढील नियोजन होईपर्यंत टँकरनेही पाणीपुरवठा अशी मागणी नागरिकांतून होत आहे . भीमा नदी कोरडी पडल्यामुळे इसबावी बंधाऱ्यात जवळपास पाणीसाठा संपुष्टात आला आहे त्यामुळे सध्या शहर व उपनगर वाड्यावस्त्यांवर तीन दिवसाआड १५-२० मिनिटे कमी दाबाने पाणी सोडून पाणीपुरवठा सुरू आहे.

सांगोला शहराची लोकसंख्या सुमारे ३८ हजार असली तरी शहराचा वाढता विस्तार ,१३ वाड्या वस्त्यांची लोकसंख्या अधिकच आहे. नगरपरिषदेकडून मालमत्ताधारकांना ६ हजार २०० नळ कनेक्शन दिली आहेत त्यानुसार मानसी सरासरी १०० लिटर प्रमाणे शहराला दररोज ५० लाख लिटर पाण्याची गरज आहे. शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी शहराच्या चौफेर ११ मुख्य संतुलन टाक्या उभारल्या आहेत तेथून शहरात पाणी वितरण केले जाते. सध्याची परिस्थिती पाहता शहरात टप्प्याटप्प्याने १० लाख लिटर पाणीपुरवठा सुरू आहे राज्यात सर्वत्र पावसा अभावी शेती व पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे.

## सांगोला येथील जखमीचा उपचारा दरम्यान मृत्यू

**सुराज्य/सांगोला**

सांगोला येथील जयभवानी चौकातून पायी जात असताना तोल जाऊन खाली कोसळून जखमी झालेले नासीर अब्दुल मुलानी (वय ५५ रा.सांगोला) हे सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना आज शनिवारी सकाळी मयत झाले. ते २३ ऑगस्ट रोजी दुपारच्या सुमारास जखमी झाले होते. त्यांना सांगोला येथे प्राथमिक उपचार करून अझरोद्दीन (मुलगा) यांनी सोलापुरात दाखल केले होते. तालुका पोलिसात या घटनेची नोंद झाली आहे.

# रक्तदान हा समाज उपयोगी कार्यक्रम : रणजित शिंदे

**सुराज्य/श्रीपूर**

आ. बबनदादांच्या वाढदिवसानिमित्त पूर्ण माढा मतदार संघात विक्रमी १०,५५५ रक्तदाते रक्तदान करतील असा संकल्प आहे. रक्तदान हा समाज उपयोगी कार्यक्रम आहे. असे प्रतिपादन सोलापूर जिल्हा दुध संघाचे चेअरमन रणजित शिंदे यांनी केले.

आ.बबनराव शिंदे यांच्या ७२ व्या वाढदिवसानिमित्त श्रीपूर येथे आ.बबनदादा शिंदे समर्थक माळशिरस तालुक व विठ्ठलराव शिंदे कारखाना पिंपळनेर (श्रीपूर गट) ऑफिस यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्याच्या उद्घाटन



प्रसंगी बोलत होते. यावेळी ५१७ रक्तदात्यांनी सहभाग नोंदवला. यावेळी नगरसेवक गटनेते राहुल रेडे-पाटील, निशांत पाटील, सरपंच अशोक कदम, राहुल खटके-पाटील, मनोज शेळके, नामदेव इंगळे, रावसाहेब सावंत-पाटील, राजेंद्र वाळेकर, विक्रम लाटे, नामदेव पाटील, मारुती रेडे, अशोक चव्हाण, विक्रम लाटे, मौला पठाण, दादासाहेब लाटे, , सुनिल राजमाने, भाऊसाहेब भांगे, राहुल टिक, दिलीप मिसाळ आदी उपस्थित होते.

## मुलगी झाल्याने पत्नीचा छळ करून मारहाण

**सोलापूर** : लग्नाच्या वेळी पत्नीच्या आई-वडिलांनी सोने,पैसे तसेच संसार उपयोगी साहित्य दिले नाहीत.तसेच पहिली मुलगी झाल्याने पत्नीला मानसिक व शारीरिक त्रास देऊन मारहाण करून उपाशीपोटी ठेवून छळ केल्याप्रकरणी पाच जणांविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना दि.११ जून २०२० ते २७ जुलै २०२३ दरम्यान फिर्यादी यांच्या सासरी पुणे येथे घडली.याप्रकरणी शाईस्ता अमिन तांबोळी (वय-२१,रा.ब्रह्मदेव नगर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पती अमिन तांबोळी,सासू नसीमा तांबोळी,सासरे अल्लाबक्ष तांबोळी,चुलत सासरे अय्यूब तांबोळी,पतीची आत्या अतिना तांबोळी (सर्व.रा.पुणे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास महिला पोलीस हवालदार स्वामी या करीत आहेत.

# घर खाली करण्यावरून दोन गटात हाणामारी; परस्परविरोधी गुन्हे दाखल

**सुराज्य/सोलापूर**

घर खाली करण्याच्या कारणावरून केबलची पाईप व लाकडाने मारहाण केल्याची घटना दि.१ सप्टेंबर रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास प्रताप नगर तांडा हिरालाल हॉटेल समोर घडली असून परस्पर विरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

पहिल्या घटनेत अनिता वालू पवार (वय-४०,रा.प्रताप नगर तांडा) यांनी भाडेकरू सागर राठोड यास त्यांचा मुलगा अभिजीत यांचे लग्न असून राहते घर खाली करा असे म्हणाल्या.त्यावेळी सागर याने आम्ही घर खाली करणार नाही असे म्हणत त्यांना शिवीगाळ करून मारहाण केली.त्यावेळी अनिता यांचे पती भांडण सोडवण्यासाठी आले




असता त्यांनाही मारहाण केली. याप्रकरणी अनिता पवार यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. सागर तानाजी राठोड व त्यांची आई जनाबाई तानाजी राठोड यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

तर दुसऱ्या घटनेत फिर्यादी जनाबाई तानाजी राठोड (वय-५३,रा. प्रताप नगर तांडा) यांना वालू गणपती पवार व त्याची पत्नी अनिता वालू पवार हे घर खाली कर असे म्हणत होते. त्यावेळी जनबाई यांनी घर खाली करत नाही असे म्हणाले असता त्यांना शिवीगाळ करून मारहाण केली. भांडण सोडवण्यासाठी त्यांचा मुलगा सागर याला असता त्याला देखील दोघांनी शिवीगाळ करून मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. तपास पोलीस हवालदार म्हेत्रे हे करीत आहेत.

## महारथोत्सवाने श्री राघवेंद्र स्वामी आराधना महोत्सवाची भक्तिमय सांगता

**सुराज्य/सोलापूर**

महारथोत्सवाने श्री राघवेंद्र स्वामी आराधना महोत्सवाची शनिवारी भक्तिमय वातावरणात सांगता झाली. मुरारजी पेठेतील श्री राघवेंद्र स्वामी मठ परिसरातून ढोल ताशांच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात आली.

प्रारंभी पहाटे ५.३० वाजता सुप्रभात सेवा झाली. यानंतर सकाळी निर्माल्य विसर्जन, अष्टोत्तर पारायण, पाद्यपूजा, पंचामृत अभिषेक करण्यात आला. यानंतर महारथोत्सवास प्रारंभ झाला. विश्वविनायक वाद्यवृंद पथकाने याप्रसंगी ढोल - ताशांचे बहारदार सादरीकरण केले. श्री संत ज्ञानेश्वर महाराज वारकरी शिक्षण संस्थेचे टाळपथक आणि महिलांचे टिपरी पथकही या मिरवणुकीत सहभागी झाले होते. सजवलेल्या रथात श्री राघवेंद्र स्वामींची मूर्ती ठेवण्यात आली होती. राघवेंद्र नगर, मुरारजी पेठ परिसरातून ही मिरवणूक पुन्हा श्री राघवेंद्र स्वामी मठासमोर विसर्जित झाली.

महारथोत्सव मिरवणूकीनंतर तुळशी अर्चना व नैवेद्य, हस्तोदक, अलंकार, महामंगल आरती व तीर्थप्रसाद कार्यक्रम झाले. यानंतर सर्व भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. काळजापूर मारुती येथील श्री राघवेंद्र स्वामी मठात देखील अशाच पद्धतीचे विधी करण्यात आले. श्री राघवेंद्र स्वामी आराधना महोत्सवाच्या तिसऱ्या व शेवटच्या दिवशीही भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी उसळली होती.

# अथर्व गार्डन येथील महालक्ष्मी देवी कुंकुमार्चना कार्यक्रमात हजारो महिलांचा सहभाग

**सुराज्य/सोलापूर**

प्रभाग क्रमांक तीन येथील भवानी पेठ घोंगडे वस्ती परिसरातील अथर्व गार्डन येथे अखिल भारत पुरोहित संघम, श्रीराम जन्मोत्सव समिती, वेणू गोपाल जिल्ला पंतलु परिवार, आणि सुरेश पाटील मित्र परिवाराच्या वतीनं श्रावण मासातील शुक्रवार निमित्त महालक्ष्मी देवी कुंकूमार्चना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सामूहिक कुंकूमार्चना कार्यक्रमांमध्ये १५५१ महिलांनी सहभाग नोंदविला होता.



पंचदशलक्ष कुंकूमार्चना नामावलीचा सेवा महिलांनी समर्पित केला. एकाच वेळी सर्व महिलांनी डोक्यावर हात उंचावून नमस्कार करत श्री महालक्ष्मी नामाचा जप केला.

देवी देवतांना लावलेल्या कुंकू मधून सतत दैवी ऊर्जेचे उत्सर्जन होत असते म्हणूनच कुंकू ला स्वतःचे असे एक आध्यात्मिक महत्त्व आहे हळद आणि कुंकूचे पूजेतील महत्त्व कुंकवामध्ये देवीचे तत्व आकर्षित करण्याची प्रचंड क्षमता असते म्हणूनच देवीला कुंकू आणि कुंकूमार्चना अतिशय प्रिय आहे कुंकुमार्चना पुजे द्वारे देवी कृपा शीघ्र प्राप्त होते असे आशीर्वाचन आणि कुंकुमार्चनाचे महत्व यावेळी श्री सद्गुरु बसवारूढ मठाचे मठाधिपती श्री शिवपुत्र स्वामी यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे अखिल भारतीय पद्मशाली पुरोहित संघमचे अध्यक्ष पंडित वेणूगोपाल जिल्ला पंतलु यांनी केले होते.

यावेळी व्यासपीठावर स्वागोत्सुक माजी सभागृह नेते सुरेश पाटील, सत्यनारायण मादास पंतलु,शुभराय मठाचे शुभांगी बुवा, प्राध्यापक अशोक निम्बर्गी,श्रीराम जन्मोत्सव समितीचे संजय साळुंखे, संजय होमकर, अक्षय अंजीखाने, सागर अतनुरे, श्री प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष श्रीनिवास संगा, भिमाशंकर जमादार,स्वाती मन्सावाले, सोलापूर सिव्हिल हॉस्पिटलचे अग्रजा चिटणीस, हेमंत पिंगळे, भिमाशंकर पदमगोंडा, संदीप महाले, यतीराज होनमाने, सतीश पारेली, महेश जेऊरे,महादेव तुम्मा, प्रवीण मुसपेठ, विनोद मुत्याल पंतलु, नागनाथ मेहकर, प्रथमेश बोमेन, वजरक्का गाजूल, विमल कन्ना, अन्नपूर्णा वेणूगोपाल जिल्ला, रजनी व्यंकटेश जिल्ला, पद्मावती श्रीमल, अपर्णा कल्याणी, बिपिन पाटील,आदींची उपस्थिती होती. यावेळी उपस्थित महिलांनी तसेच या परिसरातील भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रमासाठी यल्लाप्पा करली, पवन तगारे, सुरेश मंदकल, व्यंकटेश जाटगल, चिदानंद मासरेड्डी, नवीन गोटीपामूल, मुदका करली, रवी मंदकल, संतोष करली, कुमार शिरसिकर, बुदेप्पा पुजारी, दीपक करली, किशोर हलसंगी, नागराज रासकोंडा, निरंजन कुडक्याल, देविदास यंगलदास, संजय हंचाटे, विजय कोळी,अंबादास कोमाकुल, यांच्यासह सुरेश पाटील मित्र परिवार श्रीराम जन्मोत्सव समितीचे पदाधिकारी आदींनी परिश्रम घेतले.

# मल्लिनाथ टिमके यांचे निधन

**सुराज्य/सोलापूर**



सोलापूर जिल्हा परिषद मुख्यालय आवारातील हॉटेल पीपल्सचे मालक तथा सोलापूर महानगरपालिकेचे माजी नगरसेवक मल्लिनाथ विश्वनाथ टिमके यांचे अल्प आजाराने निधन झाले. मृत्यू समयी ते ६९ वर्षांचे होते. ते ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी विश्वनाथ टिमके यांचे चिरंजीव होते .त्यांच्या पाश्चात पत्नी, दोन मुले, सुना नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर शनिवार ( २ सप्टेंबर ) रोजी लिंगायत समशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सर्व समाज घटकातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अरुण रणखांबे यांचे निधन



**सोलापूर** : मिलिंद नगर मधील रहिवासी अरुण उर्फ बंटी रणखांबे यांचे आकस्मित दुःख निधन झाले असून त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी, तीन मुले, आई, भाऊ, बहीण असा परिवार आहे, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हीच बुद्ध चरणी प्रार्थना...

D.S.T.S. Mandal's
V.G. Shivdare College of Arts, Commerce and Science, Solapur
NAAC Re-accredited "A" grade
Affiliated to Punyashlok Ahilyadevi Holkar University, Solapur
University Solapur
Admission Notification 2023-2024
Phone - 02172303411/8329098384/9158488058/8329553696
http://www.vgscollege.com
RE-ENTRANCE EXAM SCHEDULE

| Name of Course | Day, Time and Venue | Mode of Re-Entrance Exam |
|---|---|---|
| M.Sc. Biotechnology | 09/09/2023 V. G. Shivdare College | 11.00 a.m. : 1.00 p.m. |

Mode of Exam - Multiple Choice Question (100 Mark)
**Place :** Solapur
**Date :** 02/09/2023
**Dr. Sutrave D.S** Principal
**Mr. R. V. Shivdare** Chairman



## ननवरे यांची विमुक्त जाती भटक्या जमातीच्या अध्यक्षपदी निवड

**टेंभुर्णी** : काँग्रेस पक्षाच्या भटक्या विमुक्त जाती जमाती टेंभुर्णी शहरा अध्यक्षपदी बेंबळे गावचे मुकुंद शिवराम ननवरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सोलापूर जिल्हा अध्यक्ष लक्ष्मण भोसले-पाटील यांनी मुकुंद ननवरे यांना नियुक्तीचे पत्र दिले. माजी केंद्रीय गृह मंत्री सुशीलकुमार शिंदे, जिल्हाध्यक्ष डॉ धवलसिंह प्रतापसिंह मोहिते-पाटील यांनी ननवरे यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. ननवरे यांनी, काँग्रेस पक्षाने दाखविलेल्या विश्वासास सदैव पात्र राहून मिळालेल्या संधीचा टेंभुर्णी शहरात काँग्रेस पक्ष वाढवण्यासाठी जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखालील व लक्ष्मण भोसले-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अहोरात्र प्रयत्न करून काँग्रेस नेतृत्वाच्या विश्वासास सदैव कटिबद्ध राहू असा विश्वास व्यक्त केला.

## पांढरेवाडीतील महिलांचा दारूबंदीसाठी एल्गार

**पंढरपूर** : येथील महिलांनी गावामध्ये अवैधरीत्या चालू असणारा दारू व्यवसाय बंद करावा, यासाठी एल्गार पुकारला आहे. ग्रामसभेत रीतसर मागणी करूनही दारू विक्री चालूच राहिल्याने या महिलांनी करकंब पोलिस ठाणे व उपविभागीय पोलिस अधिकारी अर्जुन भोसले यांना लेखी निवेदन देत अवैध दारू विक्री बंद न झाल्यास पोलिस ठाण्यासमोर उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. प्रथम या महिलांनी ग्रामसभेवेळी गावातून मोर्चा काढत अवैध दारू विक्री बंद करण्याची मागणी केली. दारू विक्रीमुळे गावातील तरुण पिढी व्यसनाधीन होत आहे. शिवाय अनेक दारू पिणाऱ्या पतींचा त्यांच्या पत्नींना नाहक त्रास होत आहे, असे महिलांनी म्हटले होते. यावेळी सरपंचांनी दारू विक्रेत्यांना समक्ष बोलावून सर्वांसमक्ष दारूची दुकाने बंद करण्याची विनंती केली. त्यानुसार विक्रेत्यांनी दारू विक्री बंद करण्याचे आश्वासन दिले. परंतु, त्यानंतरही त्यांनी दारू विक्री चालूच ठेवल्याने या सर्व महिलांनी पुन्हा एकत्रित येत करकंब पोलिस ठाणे व उपविभागीय पोलिस अधिकारी अर्जुन भोसले यांची पंढरपूर येथे भेट घेऊन त्यांच्याकडे अवैध दारू विक्री बंद करण्याची मागणी केली आहे.

## कोडग यांना गुरुजन जीवन गौरव पुरस्कार प्रदान



**वेळापूर** : तोंडले तालुका माळशिरस येथील आणि हनुमान हायस्कूल तांदुळवाडी चे सहशिक्षक नवनाथ ज्ञानेश्वर कोडग यांना २१ वर्ष उल्लेखनीय काम केल्याबद्दल मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमी मुंबई यांच्यावतिने राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक गुरु गौरव शिक्षक रत्न पुरस्कार २०२३ ( राज्यस्तरीय गुरुजन जीवन गौरव पुरस्कार) प्रदान करण्यात आला. कोडग यांनी आज तागायत केलेल्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व विद्यार्थ्यांच्या हितासाठी राबवलेले विविध उपक्रम यांची दखल घेऊन त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. हा पुरस्कार नवनाथ कोडग यांना हनुमान हायस्कूल तांदळवाडी चे प्राचार्य देवकरसर यांच्याहस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. नवनाथ कोडग यांना पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

## नीता श्रीश्रीमाळ यांची उपशिक्षणाधिकारी पदी निवड

**बार्शी** : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या महाराष्ट्र शिक्षण सेवा (प्रशासन शाखा) गट ब मर्यादित विभागीय परीक्षा, या संवर्गातून निता हरिचंद श्रीश्रीमाळ यांची उपशिक्षणाधिकारी या पदावर निवड आली आहे. श्रीश्रीमाळ यांचे १० वी पर्यंत शिक्षण सुलाखे हायस्कूल, बार्शी येथे झाले. बी एस्सी पर्यंतचे शिक्षण श्री शिवाजी कॉलेज, बार्शी येथून झाले. तसेच बी एस्सी श्री शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथून झाले. श्रीश्रीमाळ यांनी आदित्य कॉलेज ऑफ एज्यूकेशन, बीड तसेच जिल्हा परिषद हायस्कूल, नायगाव, जि. नांदेड, आणि शासकीय अध्यापक विद्यालय (स्त्री) औरंगाबाद, शासकीय विद्यानिकेतन औरंगाबाद येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत होत्या. तसेच शासकीय अध्यापक विद्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद येथे त्या प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

## देवाचा हार मिरवण्यावरून एकास काठीचा मार

**बार्शी** : नागनाथ महाराजांचा हार तुझ्याच गाडीतून का मिरवतो तो हार माझ्या गाडीत घाल असे म्हणून एकास काठीने व दगडाने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी चौघांवर बार्शी तालुका पोलीसांत गुन्हा दाखल झाला आहे. पंकज उर्फ बबलू तुळशीराम भोसले, रोहन विष्णू भोसले, अक्षय पिंटू पंढरे, विवेक विष्णू भोसले (सर्व रा. नागोबाचीवाडी ता. बार्शी ) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयितांची नावे आहेत. गणेश महादेव चव्हाण वय २३ रा. नागोबाचीवाडी याने याप्रकरणी फिर्याद दिली आहे. दि. ३१ रोजी सकाळी ही घटना घडली. नागोबाचीवाडी येथे दि. २४ पासून ग्रामदैवत नागनाथ महाराज यांच्या यात्रेनिमीत्त विविध कार्यक्रम सुरू आहेत. त्यात हा प्रकार घडला. अधिक तपास पोलीस करत आहेत.

# लाठीमार करणाऱ्या निर्दयी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करा

### सर्व पक्षीय आंदोलनात दिलीप धोत्रे यांची मागणी

### पंढरीत सरकारच्या विरोधात तिरडी आंदोलन

सुराज्य/पंढरपूर

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथील मराठा समाजाच्या उपोषणकर्त्यावर अमानुषपणे लाठीमार केलेल्या घटनेचा निषेध करण्यासाठी सर्वपक्षीय आंदोलन करण्यात आले. लाठीमार करणाऱ्या निर्दयी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी यावेळी मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी केली.

जालना जिल्ह्यातील अंतरवली सराटी येथे मराठा समाजाचे आपल्या न्याय हक्कासाठी कायदेशीर पद्धतीने आंदोलन चालू होते. परंतु हे आंदोलन दडपण्यासाठी शासनात बसलेल्या मंत्र्यांनी आदेश देऊन त्या ठिकाणी पोलिसांना उपोषणकर्त्यावर लाठीमार करायला लावले. पुरोगामी महाराष्ट्रातील ही अतिशय दुर्दैवी घटना घडलेली आहे. या अमानुष लाठीमार घटनेच्या पाठीमागे कोण आहे ?याची सखोल चौकशी करण्याची मागणी मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी केली .



मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे म्हणून गेले चार दिवस त्या गावातील सर्व ग्रामस्थ त्या ठिकाणी अतिशय शांततेत आंदोलन करत होते, परंतु त्या ठिकाणच्या पोलीस अधिकाऱ्यांनी अतिशय शांततेत चाललेला आंदोलन चिरडून टाकून त्या ठिकाणी महिला माता-भगिनी, पुरुष ,वडीलधारी मंडळी ,ज्येष्ठ नागरिक यांच्यावर अतिशय अमानुषपणे लाठी हल्ला केला. आणि त्याहीपेक्षा दुर्दैवाची गोष्ट म्हणजे ज्यांच्यावर लाठी हल्ला केला त्याच लोकांवर या ठिकाणी चुकीच्या पद्धतीने खोटे गुन्हे दाखल केलेले आहेत. हे महाराष्ट्रासाठी अतिशय दुर्दैवी घटना आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळालेच पाहिजे यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना मराठा समाजाच्या पाठीशी आहे. मराठा समाजाच्या या न्याय हक्क मागण्यासाठी जे जे करावे लागेल ज्या ज्या ठिकाणी आंदोलन होतील त्या सर्व ठिकाणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सर्व कार्यकर्ते पदाधिकारी हे उपस्थित असतील असे दिलीप धोत्रे यांनी सांगितले. या आंदोलनामध्ये पंढरपूर शहर तालुक्यातील सर्वपक्षीय नेते कार्यकर्ते मराठा समाजाचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

## मराठा आंदोलकांवर झालेल्या लाठीचार्जचा बार्शीत निषेध

सुराज्य/बार्शी

जालन्याच्या अंतरवाली सराटी गावात मराठा आरक्षणासाठी उपोषण करणाऱ्या आंदोलकांवर पोलिसांनी अमानुष लाठीचार्ज केला. या घटनेचा सर्वत्र निषेध होत असून बार्शीतही सकल मराठा समाजाच्यावतीने शहरातील पांडे चौकात आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलनकर्त्यांनी सरकारचा व जालन्याच्या पोलीस प्रशासना निषेध करत जोरदार घोषणाबाजी केली. तत्पूर्वी अज्ञात आंदोलनकर्त्यांनी रस्त्यावर टायर पेटवले होते.

एक मराठा, लाख मराठा, आरक्षण आमच्या हक्काचं, नाही कुणाच्या बापाचं, कोण म्हणतं देत नाही आरक्षण घेतल्या शिवाय राहत नाही, सरकार हमसे डरती है, पोलीस को आगे करती है , जालना पोलीस बडतर्फ करा अशी घोषणाबाजी केली. सुमारे तासभर हे आंदोलन चालले.

मराठा समाजाने आरक्षणासाठी राज्यभरात ५८ मोर्चे शांततेत काढले. मराठा समाज बांधवांनी शांततेचा आदर्श घालून दिला आहे . जालन्यात असेच शांततेत आंदोलन करणाऱ्या मराठा आंदोलनकर्त्यावर जालना पोलिसांनी अमानुष लाठीचार्ज केला. याचा आम्ही तीव्र निषेध करतो अशा भावना यावेळी बार्शीत सकल मराठा समाजातील आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केल्या. सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर उदार यांनी आंदोलनकर्त्यांची भेट घेऊन याबाबत आपल्या भावना शासनापर्यंत पोहोचवण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलनाची सांगता झाली. सुमित नवले, हर्षवर्धन पाटील यांच्यासह समाज बांधव यावेळी उपस्थित होते. आले आहे

## परंडा कडकडीत बंद; रास्ता रोको आणि निषेध

सुराज्य/परंडा

सराटी अंतरवाली फाटा ( ता. अंबड जि.जालना ) येथे मराठा आरक्षण मागणीसाठी आमरण उपोषण सुरु असताना मराठा आंदोलकावर लाठीचार्ज व गोळीबार करणाऱ्या पोलीस प्रशासनावर कार्यवाही करण्यात यावी, या मागणीचे निवेदन सकल मराठा समाजाच्या वतीने शनिवार परंडा तहसिलदार घनश्याम आडसूळ यांना देण्यात आले. यावेळी पोलीस निरिक्षक विनोद इज्जपवार उपस्थित होते.

दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले व लाठीचार्ज घटनेचा व राज्य सरकारचा तीव्र निषेध करण्यात आला तसेच आरक्षणाची जोरदार मागणी करण्यात आली . यावेळी विविध राजकीय पक्ष ,



संघटना व पदाधिकारी यांनी सहभागी होऊन पाठिंबा दिला . तसेच परंडा शहर व तालुका कडकडीत बंद ठेवण्यात आला होता बससेवा ठप्प होती . यावेळी पोलीस बंदोबस्त चोख होता. मुख्यमंत्र्यांना तहसीलदार यांच्या मार्फत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि , शुक्रवारी सराटी अंतरवाली येथे मराठा आरक्षण आंदोलनातील मराठा समाजातील महिला, मुले, तरूण तसेच वृध्द आंदोलकावर संबंधित पोलीस यंत्रणेने बेछुट व अमानुष लाठीचार्ज करून अनेक आंदोलकांना गंभीर जखमी केले व नाहक हवेत गोळीबार करून मराठा समाजामध्ये दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. मराठा आंदोलकावर बेछुट लाठीचार्ज करणाऱ्या संबंधित यंत्रणेची सखोल चौकशी करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावेत .

## ८१ मंडलांमध्ये दोन महिने पावसाचा खंड

सुराज्य/सोलापूर

जिल्ह्यातील ९१ महसूल मंडलांपैकी ८१ मंडलांमध्ये १ जून ते ३१ ऑगस्ट या तीन महिन्यांत तब्बल ६० ते ८० दिवस पाऊस पडलेला नाही. पंढरपूर, सांगोला, माळशिरस, मंगळवेढा या चार तालुक्यांमध्ये चिंताजनक स्थिती आहे. अक्षरश: बळिराजाच्या डोळ्यांदेखत पाण्याअभावी पिके माना टाकत आहेत. या पार्श्वभूमीवर संपूर्ण जिल्हाच दुष्काळाच्या दुष्टचक्रात अडकला आहे.

सोलापूर शहर व जिल्ह्याची भिस्त उजनी धरणावरच अवलंबून आहे. पण, पावसाअभावी उजनी धरण सध्या १६ टक्क्यांपर्यंत पोचले आहे. दुसरीकडे जिल्ह्यात एकरुख, हिंगणी, तिऱ्हे, वडाळा बार्शी बार्शी, आगळगाव, उपळे दुमाला, गौडगाव, खांडवी, पानगाव, पांगरी, नारी, सुर्डी अक्कलकोट अक्कलकोट, जेऊर, तडवळ, करजगी, मैंदर्गी, चपळगाव, किणी, दुधनी द. सोलापूर सोलापूर, वळसंग, मंद्रूप, होटगी, निंबर्गी, विंचूर, मंगळवेढा बोराळे, मरवडे, आंधळगाव, मारापूर, मंगळवेढा, भोसे, हुलजंती सांगोला, शिवणे, जवळा, हतीद, सोणंद, महूद, कोळा, नाझरा, संगेवाड माळशिरस माळशिरस, इस्लामपूर, सदाशिवनगर, दहिगाव, नातेपुते, अकलूज, लवंग, महाळुंग, वेळापूर, पिलीव करमाळा करमाळा, अर्जुननगर, केम, सोलसे, कोर्टी, उमरड, केत्तूर मोहोळ कामती, मोडनिंब, लऊळ पंढरपूर पंढरपूर, भंडिशेगाव, भाळवणी, करकंब, पिराचीकुरोली, पुळूज, चळे, तुंगत, कासेगाव या गावात ६० दिवसांपेक्षा अधिक पावसाचा खंड पडला आहे.

## वीज मंडळाच्या तारांची चोरी

सुराज्य/बार्शी

वीज मंडळाच्या ६५ हजार रूपये किंमतीच्या ६५० फूट लांबीच्या अॅल्युमिनीयमच्या तारांची चोरी झाली. दि. २६ ऑगस्ट ते ३१ ऑगस्टच्या दरम्यान हा प्रकार घडला. याबाबत एमएसईबी पांगरीच्या प्रिन्सीपल टेक्नीशियन शुभागी पसफुले यांनी फिर्याद दिली आहे. कुसळंब हद्दीतील गणेश हॉटेलच्या पाठीमागील बाजूस बार्शी ते कारी जाणारे डमी लाईनच्या चार गाळे अॅल्युमिनीयमच्या तारा अज्ञात चोरटयाने चोरून नेल्या.

## लाठी हल्ल्याचा तीव्र निषेध

# मंगळवेढ्यातील दामाजी चौकात रास्ता रोको

सुराज्य/मंगळवेढा

मराठा आरक्षणासाठी जालना येथे मराठा आरक्षणासाठी बसलेल्या आंदोलकावर पोलिसांनी लाठीमार केल्याच्या निषेधार्थ शनिवारी मंगळवेढा येथील दामाजी चौकात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात महायुती सरकारचा तीव्र निषेध करण्यात आला.आंदोलनाची तीव्रता लक्षात घेऊन मंगळवेढा आगारातून सकाळच्या सत्रात बाहेर पडणाऱ्या एसटी बसेस बंद करण्यात आल्यामुळे शाळकरी विद्यार्थी व बाहेरगावी जाणाऱ्यांची चांगलीच गैरसाय झाली.

यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पश्चिम महाराष्ट्र युवा आघाडीचे अध्यक्ष अॅड



राहूल घुले,खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष सिद्धेश्वर अवताडे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष चंद्रशेखर कौंडूभैरी, भाजपाचे जिल्हा संघटन सरचिटणीस शशिकांत चव्हाण, अजित जगताप, मुरलीधर दत्तू ,नारायण गोवे, विठ्ठल गायकवाड, ज्ञानेश्वर कौंडूभैरी,शरद हेंबाडे,येताळा भगत,राजेंद्र चेळेकर, सोमनाथ अवताडे, दिगंबर यादव, सतीश दत्तू, राजेंद्र चेळेकर चंद्रकांत काकडे, संतोष पवार,आदी उपस्थित होते

यावेळी बोलताना पश्चिम महाराष्ट्र युवा आघाडीचे अध्यक्ष अॅड. राहुल घुले म्हणाले की, मराठा समाज कदापी गप्प बसणार नाही, त्यातील मास्टरमाईंड कोण आहे हे देखील मराठा समाजाला माहित आहे. आरक्षण दिले असे सांगणाऱ्याने सदावर्ते यांना पुढे केले व त्याला बळ दिले. ज्यांनी लाठीमार करण्याचे आदेश दिले त्यांची खुर्ची जाळू असा इशारा दिला ज्ञानेश्वर कौडूभैरी म्हणाले की, दोन वर्षांपूर्वी आरक्षणावरून निघालेल्या शांतता प्रिय मोर्चामध्ये ज्या मराठा बांधवांनी पोलिसांना पाणी पाजले त्याची जाणीव देखील त्या पोलिसांनी ठेवली नाही. आरक्षण देण्यासाठी निष्क्रियता दाखवून लाठीमार करणाऱ्या मुख्यमंत्री व दोन उपमुख्यमंत्री यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा. यावेळी कडे कोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यावेळी युवराज घुले, नारायण गोवे,संतोष पवार,अॅड रविकिरण कोळेकर यांची भाषणे झाली .दरम्यान या घटनेचे निषेधार्थ सकल मराठा समाजाच्या वतीने उद्या मंगळवेढा बंदचे आयोजन करण्यात आले आहे.

## निलेश बागाव यांच्याकडून वाहतूक नियमांची जनजागृती

सुराज्य/वेळापूर

वेळापूर पोलीस स्टेशनच्या वतीने वेळापूर शहर येथील पालखी चौक येथे वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी निलेश बागाव यांनी वाहन चालकांना गुलाब पुष्प देऊन वाहतूक नियमांन बाबत जनजागृती केली आहे

यावेळी पुणे पंढरपूर रोड, अकलूज सांगोला रोड या मार्गावरून येणाऱ्या वाहन वाहनधारकांमध्ये जनजागृती व्हावी याकरिता अभियान राबविण्यात आले. अभियानादरम्यान नियम मोडणाऱ्या वाहनधारकांना नियम पाळणे बाबत सूचना देऊन गुलाब पुष्प देऊन तसेच हेल्मेट वाटप करून जनजागृती करण्यात आली.

वाहतुकीचे नियम सर्वांनी पाळावेत, अठरा वर्षाखालील मुलांनी वाहन चालवू नये, विना हेल्मेट वाहन चालवू नये .विना सीट बेल्ट वाहन चालवू नये. ट्रिपल सीट वाहन चालवू नये धोकादायक पद्धतीने वाहनांमध्ये मालवाहतूक करू नये अशा सूचना देण्यात आल्या. यापुढे वाहतूक नियमाचे पालन न केल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल अशी सक्त ताकीद वाहनधारकांना देण्यात आली.




यावेळी पोलीस हवालदार उमाजी चव्हाण, जर्नादन करे, ट्रॉफिक अंमलदार पो.ना. साहिल तांबोळी, पो.कॉ. सोमनाथ यालमार तसेच पोना नितीन लिंगडे ,मच्छिंद्र राजगे ,गणेश क्षीरसागर आणि इंग्लिश स्कूलचे विद्यार्थी उपस्थित होते.

## बार्शी शहरात दोन दुकाने फोडली, ५२ हजारांचा ऐवज लंपास

सुराज्य/बार्शी

बार्शी शहरातील शिवाजी कॉलेज रोड, महाराष्ट्र बँके समोर शिवाजी नगर येथील एका चहाच्या दुकाना सह कपड्याचे दुकान अशा दोन दुकानाचे शटर उचकटून सुमारे ५२ हजाराचा माल व रोख रक्कमेसह चोरट्याने चक्क हिशोबाच्या वह्या, दुकानाचे लायसन व इतर कागदपत्र देखील पळवून नेल्याचा प्रकार घडला आहे. याबाबत अश्रु सुग्रीव त्रिंबके यांनी शहर पोलीसात फिर्याद दिली आहे.

३१ ऑगस्ट रोजी फिर्यादी अश्रु हा कपडयाचे रात्री १०.३० वाजता दुकान बंद करुन घरी गेला होता. दुसऱ्या दिवशी सकाळी शेजारील हॉटेल मालक रणजित घावटे याने फिर्यादीचे कपड्याचे व स्वत:चे चहाचे दुकान फोडून १० हजाराचे चोरी झाल्याचे सांगितले. त्यानंतर फिर्यादीने जावूत कपड्यांची दुकानात पाहणी केली असता दुकानाचा पाठीमागून पत्रा उचकटलेला दिसला. दुकान उघडुन आत पाहीले असता दुकानातील कपडे उचकटुन रॅकखाली पडलेले दिसले. तर दुकानातील जिन्स, शर्ट, अंडर गारमेंट बॉक्स, टी शर्ट, रोख रक्कम मिळून ४२ हजार रुपयाचे सामानासह दुकानातील चक्क हिशोबाच्या वह्या, दुकानाचे लायसन व इतर कागदपत्र चोरीस नेल्याचा प्रकार घडला आहे.

## आ. बबनराव शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त टेंभुर्णीत २०० जणांनी केले रक्तदान

सुराज्य/टेंभुर्णी

टेंभुर्णी येथे अमोल धोत्रे मित्र परिवाराच्या वतीने आ. बबनदादा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरासाठी एकूण २०० रक्तदात्यांनी रक्तदान केले.

या कार्यक्रमासाठी आमदार बबनदादा शिंदे, टेंभुर्णीचे पो.नि. दिपक पाटील , रावसाहेब देशमुख ,संभाजी पाटील, सुरज देशमुख, डॉ. राहुल पाटील, नामदेव धोत्रे , विकास धोत्रे, संतोष धोत्रे ,भाऊसाहेब धोत्रे, तात्या शिंदे, दिपक मंजुळे, सुभाष पवार, नितीन पाटील, विजय देशमुख, सोमनाथ कदम, शैलेश




ओव्होळ, गणेश केचे, आकाश पाटील, बाळासाहेब बारवे, राहुल टिपाले, रोहित ढावरे, राहुल खटके, राम पवार, विकास धोत्रे, महादेव पवार ,अवि भोसले ,रोहित खडके, संग्राम देशमुख, सचिन पवार, दिपक पवार, अक्षय मेथा, गौतम पवार, केदार नाळे हे उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी यशपाल लोंढे ,वैभव महाडिक, मनीष धोत्रे, गोपाळ पवार, अदनान देशमुख, अण्णा धोत्रे, आकाश धोत्रे, प्रकाश धोत्रे, स्वप्निल कुंभार, दादा माने, कालिदास पवार, आशिष लोंढे, शुभम माने ,सौरभ चव्हाण, रोहन जाधव, अदनान देशमुख, अविनाश धोत्रे, बालाजी जगताप, कुलदीप गायकवाड, अनिल पवार, विराग मेथा, लखन गायकवाड, राहुल ढवळशंख, फैयाज आतार, चेतन नाईकनवरे, बापु चव्हाण ,शकलीन तांबोळी, आसिफ आतार, परवेज शेख ,दिपक मासुळे , सोन्या धोत्रे ,शांतीलाल माने, तात्या सिताप, अक्षय स्वामी, विकास सरतापे, अक्षय मुसळे, चेतन मुसळे, नामदेव मंजुळकर ,अनिल माने, बापु ननवरे, योगेश साळुंखे, प्रेम जगताप, धीरज गायकवाड, सागर कुंभार,अजित गोंदिल ,सोमा पावसे,अरबाज बागवान, यांनी परिश्रम घेतले.

# मराठा समाजाच्या वतीने रविवारी कुर्डूवाडी बंदची हाक

सुराज्य/कुर्डूवाडी

### कुर्डूवाडी बाह्यवळण रस्त्यावर व रिधोरे येथे रस्ता रोको

मराठा आरक्षण संविधानीक मार्गाने मागणी करणाऱ्या जालन्यातील मराठा बंधूभगिनींवर पोलिसांमार्फत अमानुषपणे लाठीचार्ज करणाऱ्या प्रशासनाचा जाहीर निषेध नोंदविण्यासाठी महाराष्ट्र बंद पुकारण्यात आला असून या आंदोलनास पाठींबा देण्यासाठी रविवार दि.३ रोजी सकल मराठा समाजाच्या वतीने कुर्डूवाडी शहर बंद पुकारण्यात आला आहे.

उपविभागीय अधिकारी यांना यासंदर्भात निवेदन देण्यात येणार आहे. तरी सर्व समाज बांधवांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये रविवारी दि.३ रोजी सकाळी १० वा. उपस्थित राहावे असे आवाहन सकल मराठा मोर्चाचे समन्वयक संजय टोणपे यांनी केले आहे. तसेच कुर्डुवाडी-बार्शी बाह्यवळण रस्त्यावरील छत्रपती संभाजी महाराज चौक (पंढरपूर चौक) येथे सकाळी १० वाजता रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार असून समाज बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन उमेश पाटील यांनी केले आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने पोलिसांच्या लाठी हल्ल्याचा निषेध म्हणून कुर्डुवाडी - बार्शी रोडवरील रिधोरे येथे सकाळी १० वाजता चक्काजाम आंदोलन करण्यात येणार तरी मराठा बांधवांनी रिधोरे येथे उपस्थित राहावे असे आवाहन अजिनाथ परबत यांनी केले आहे.

# आ. देशमुख यांच्या निधीमधून साकारणार वारकरी भवन

## १६ सप्टेंबर रोजी होणार भूमिपूजन

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापुरातील वारकऱ्यांची धार्मिक भूक भागविण्याच्या अनुषंगाने अखिल भाविक वारकरी मंडळाच्यावतीने सुरू असलेल्या प्रयत्नाला यश आले आहे. पालकमंत्री असताना आमदार विजयकुमार देशमुख यांनी वारकरी भवनासाठी सुमारे एक ते दीड कोटींचा निधी मंजूर केला. या निधीतून दमाणीनगर भागातील जाम मिलमधील सोलापूर महानगरपालिकेच्या आरक्षित दोन एकर जागेतील १० हजार स्क्वेअर फूट जागेमध्ये भव्य वारकरी भवन बांधण्यात येत आहे.





### लाखो वारकऱ्यांना फायदा होणार : इंगळे महाराज

वारकरी भावनात मोठी श्री विठ्ठलाची मूर्ती उभारण्यात येणार आहे. तसेच सार्वजनिकरित्या महाराष्ट्रात सोलापुरातील हे एकमेव वारकरी भवन असल्याचे सुधाकर इंगळे महाराज यांनी सांगितले. आ. विजयकुमार देशमुख यांच्या निधीतून होत असलेल्या या वारकरी भवनाचा सोलापूर शहरातील लाखो वारकऱ्यांना फायदा होणार असल्याचे सांगत यामुळे वारकऱ्यांचे धार्मिक अधिष्ठान आणखी बळकट होण्यास मदत होणार असल्याचेही सुधाकर इंगळे महाराज यांनी सांगितले.

या वारकरी भवनाचा भूमिपूजन समारंभ १६ सप्टेंबर २०२३ रोजी जगद्गुरु तसेच पंढरपूर श्री विठ्ठल रुक्मिणी देवस्थानचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या दिव्य सानिध्यात तसेच आमदार विजयकुमार देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असल्याची माहिती, अखिल भाविक वारकरी मंडळाचे अध्यक्ष हभप सुधाकर इंगळे महाराज यांनी शनिवारी दिली. जाम मिलमध्ये महापालिकेच्या आरक्षित दोन एकर जागेपैकी दहा हजार स्क्वेअर फुट जागा वारकरी भवनासाठी निश्चित करण्यात आली आहे.

दरवर्षी अखिल भाविक वारकरी मंडळाच्यावतीने नॉर्थकोट प्रशालेच्या मैदानावर माघवारी पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. पालकमंत्री असताना आमदार विजयकुमार देशमुख या रिंगण सोहळ्याला उपस्थित होते. यावेळी हभप सुधाकर इंगळे महाराज यांनी समस्त वारकऱ्यांच्यावतीने सोलापुरात वारकरी भवन असावे, अशी मागणी आमदार विजयकुमार देशमुख यांच्याकडे केली होती. त्यानंतर वारकरी भवनासाठी आपण जरूर निधी देऊ असे अभिवचन आमदार देशमुख यांनी समस्त वारकऱ्यांना दिले होते. ते वचन पूर्ण करत या वारकरी भावनासाठी एक ते दीड कोटींचा निधी मंजूर झाला आहे.

आमदार विजयकुमार देशमुख यांच्या निधीतील या वारकरी भवनाच्या कामाचा भूमिपूजन समारंभ १६ सप्टेंबर रोजी होत असल्याबद्दल आनंद होत असल्याचे सुधाकर इंगळे महाराज यांनी सांगितले. शनिवारी दुपारी सुधाकर इंगळे महाराज यांनी जाम मिलमधील महापालिकेच्या आरक्षित जागेची पाहणी केली. त्यांच्यासोबत हभप संजय पवार तसेच अन्य सहकारी वारकरी उपस्थित होते.



## वीज कामगार महासंघाची प्रदेश समितीची बैठक

✔ **सोलापूर** : महाराष्ट्र वीज कामगार महासंघाची प्रदेश कार्य समितीची बैठक सोलापूर येथील मातोश्री सौ. सुभद्राबाई जाधव सांस्कृतिक भवन येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस संपूर्ण महाराष्ट्रातून १४० पदाधिकाऱ्यांनी सहभाग नोंदवला. बैठकीचे उद्घाटन महासंघाचे अध्यक्ष विठ्ठल भालेराव, महामंत्री अरुण पिवळ आणि संघटनमंत्री विजय हिंगमिरे व तिन्ही कंपनीचे कार्याध्यक्ष यांच्या उपस्थितीत करण्यात आले. प्रस्तावना अरुण पिवळ यांनी केले.

कुडाळ ते सोलापूर या चार महिन्याच्या कालावधीत तीनही कंपनीतील व्यवस्थापनेबरोबर झालेल्या चर्चा व मार्गी लागलेले प्रश्न यांचा आढावा घेण्यात आला. माहे मे व जुलै २०२३ या दोन सत्रात वरिष्ठ पदाधिकाऱ्यांचा अभ्यास वर्ग घेण्यात आला. त्यामागची संघटनेची भूमिका आणि अभ्यास वर्ग घेण्याचा उद्देश, भविष्यात संघटनेचा पदाधिकाऱ्याला विविध विषयांचे ज्ञान प्राप्त करून संघटनेच्या दैनंदिन कामकाजात सक्षमरित्या कार्यरत राहिला पाहिजे याद्दष्टीने महासंघ अभ्यास वर्गाचे विविध स्तरावर आयोजन केले जाते.

महाराष्ट्र वीज कामगार संघाचे माजी महामंत्री एस. टी. म्हेत्रे हे सोलापूरचे रहिवासी असून त्यांचा विद्युत क्षेत्रावर असलेला गाढा अभ्यास व संघटना पातळीवर कार्यकर्त्यांची जबाबदारी, कर्तव्य याविषयी मार्गदर्शन केले. सदर कार्य समिती बैठकीस एस. टी. म्हेत्रे, अनंतराव मोडक, मदन कुलकर्णी हे उपस्थित होते.



## महावीर हायस्कूलच्या विद्यार्थ्यांची ब्रिजधाम वृद्धाश्रमाला भेट

✔ **सोलापूर** : महावीर हायस्कूलमधील विद्यार्थी व विद्यार्थिनींचे एक दिवसीय सहलीचे औचित्य साधून मुलांना एक आगळ्या-वेगळ्या ठिकाणी म्हणजे सोरेगाव येथील वृद्धाश्रमास भेट दिली. ब्रिजमोहन फोफलिया यांच्या सहकार्याने वृद्धाश्रमात अतिशय सुंदर मनमोहक शंकराची व संस्काराची शिदोरी देणारे मातापित्यांची, संत रोहिदास, संत पुंडलिक, श्रावणबाळ अशा अनेक मूर्ती तयार केलेले आहेत. तसेच अनेक फळांच्या, फुलांच्या झाडांनी तेथील वातावरण नयनरम्य बनलेले आहे. सुंदर बगीचा, हिरवेगार गवत, राजस्थानमधील वाळू हे दृश्य बघून मनाला प्रसन्नता वाटते. वृद्धांसाठी असलेला भोजन कक्ष, भजन, कीर्तन करण्याचे स्थान व त्या वृद्धाविषयी व तेथील व्यवस्थापन तसेच विविध मूर्तींबद्दल सखोल माहिती तेथील व्यवस्थापक व्यंकटेश रेड्डी यांनी सोप्या भाषेत विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

सर्व वृद्धांना गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आला. यावेळी काही वृद्धांनी भजन, गाणे अतिशय सुंदर आवाजात सादर केले. या एक दिवसीय सहल यशस्वी करण्यासाठी प्रशालेचे मुख्याध्यापिका उज्वला पाटील, सहशिक्षक अभिनंदन विभूते, विजय पाटील, राजेंद्र खोत, संजय बडवई, बसवराज बिराजदार, देशभूषण हसाळे, मनोजकुमार गायकवाड, शिक्षकेतर कर्मचारी महेश म्हेंता, मोहन साळुंखे यांनी परिश्रम घेतले.



## इप्पाकायल शाळेत क्रीडा दिन साजरा

✔ **सोलापूर** : येथील पद्मशाली शिक्षण संस्था संचलित रामदास नरसय्या इप्पाकायल प्राथमिक शाळेत मेजर ध्यानचंद (हॉकीचे जादूगर) यांचा जन्म राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रम सहशिक्षिका शीतल बोरला यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

यावेळी शाळेचे क्रीडा शिक्षक नागेश खुने यांनी मेजर ध्यानचंद यांच्या जीवनाविषयी मनोगत व्यक्त केले व विद्यार्थ्यांना खेळाचे महत्व सांगितले. याप्रसंगी शाळेतील राष्ट्रीय स्तरावर कराटे खेळाडू, राज्यस्तरीय स्क्वॉश खेळाडू व जिल्हास्तरीय योगासनाचे खेळाडू उपस्थित होते. तसेच यावेळी खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. शाळेत विविध क्रीडा स्पर्धा घेण्यात आले. अध्यक्षीय भाषणाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आले. सूत्रसंचालन दीपाराणी भारत व आभार नागेश खुने यांनी केले.

## नागनाथ मंडळाच्या अध्यक्षपदी खंडाखडे



✔ **सोलापूर** : येथील शशिकला नगर, नागनाथ क्रीडा सांस्कृतिक व समाजसेवा मंडळ उपरोक्त विषयास अनुसरुन विनंती करण्यात येते की, वार्षिक सर्वसाधारण सभा होऊन सन २०२३-२०२४ या मंडळाचे मार्गदर्शन श्रीनिवास वांझरे यांच्या सर्वानुमते निवड करण्यात आले.

त्यांची नावे पुढीलप्रमाणे, अध्यक्ष संजय खंडाखडे, उपाध्यक्ष व्यंकटेश करली, आप्पाशा चाबुकस्वार, सचिव नागेश कोळी, सहसचिव संतोष माळवदकर, खजिनदार शिवशरण रामपुरे, सहखजिनदार गणेश खंडाखडे, कार्याध्यक्ष, कार्याध्यक्ष संतोष कटारे, सहकार्याध्यक्ष श्रीनिवास गोरंटला, मिरवणूक प्रमुख कुलदीप कटारे, अंबादास राजखडे, विजय वाघमारे, लेझीम प्रमुख नागेश वाघमारे, गुंडाप्पा देसाई, हरीश चाबुकस्वार, उत्सव प्रमुख बालाजी गणपा, लक्ष्मण गदगीन, संतोष कोळी, प्रसिध्दी प्रमुख नवनाथ गोरंटला, सहप्रसिध्दी प्रमुख शुभम खमितकर, पूजा प्रमुख सुभाष गोरंटला.

## काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान

✔ सुराज्य/सोलापूर



सोलापूर जिल्हा भटक्या विमुक्त जाती व जमाती समाजाच्यावतीने काँग्रेस भवन येथे पदाधिकारी मेळावा व नियुक्तीपत्र कार्यक्रम पार पाडला.

यावेळी आमदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते जिल्हाध्यक्ष डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते यांच्या अध्यक्षतेखाली प्रदेश अध्यक्ष व्हिजेएनटी ॲड. पल्लवी रेनके बादल गायकवाड, सामाजिक न्याय विभाग प्रदेश कार्याध्यक्ष व्हिजेएनटीचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण भोसले यांच्यावतीने नियुक्त पत्र कार्यक्रम संपन्न झाला. जिल्हा पदाधिकारी म्हणून नव्याने पुढील मान्यवरांची मान्यवरांची नेमणूक केली.

जिल्हा उपाध्यक्ष शंकर धोत्रे, सोमनाथ धोत्रे, सिद्राम पवार, लांडगे सर, जिल्हा कार्याध्यक्ष संजयलाल राठोड, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख श्रीशैल रणखांबे, जिल्हा संघटक महादेव खांडेकर, दगडू झापू राठोड, जिल्हा उपाध्यक्ष रेवू छत्री.

यावेळी सोलापूर जिल्ह्यातील अकरा तालुका अध्यक्ष व शहराध्यक्ष यांना नियुक्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी अक्कलकोट तालुका अध्यक्ष वसंत लक्ष्मण राठोड, अक्कलकोट शहर अध्यक्ष विलास राठोड, दक्षिण सोलापूर तालुका अध्यक्ष राजकुमार शिवाजी राठोड, दक्षिण सोलापूर शहराध्यक्ष मोतीलाल राठोड, उत्तर सोलापूर तालुका अध्यक्ष दत्तात्रय भानुदास छत्रे, उपाध्यक्ष तुकाराम जाधव, भगवान सुरवसे, भीमा भोसले-पाटील, शिवाजी कांगरे, विनोद पांढरे, इरप्पा अलकुंटे, उत्तर सोलापूर शहर अध्यक्ष रतन भोसले, मोहोळ तालुका अध्यक्ष प्रकाश पवार, शहराध्यक्ष शंकर पवार, मंगळवेढा समाधान पवार, माळशिरस सुहास ज्ञानदेव बिरलिंगे, करमाळा तालुका अध्यक्ष युवराज गेना सुकळे, करमाळा शहराध्यक्ष सुरेश ईश्वर काळे, माढा तालुका अध्यक्ष अनिल नामदेव धोत्रे, माढा शहराध्यक्ष काका निकम शाहीर, विजय शिंदे, जिल्हाध्यक्ष लक्ष्मण भोसले, भीमराव बंडगर, दलित मित्र पुरस्कार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मोतीराम चव्हाण, महासचिव भोजराज पवार, युवराज जाधव, मल्लेश सूर्यवंशी, बाळगे सर, सुधीर लांडे, मल्लेशी बिडवेकर, रमेश हसापुरे, विजय हत्तुरे, सुनील भोसले, सुभाष चौगुले, श्रीशैल रणखांबे (विज्ञान तंत्रज्ञ कौशल्य विभाग जिल्हाध्यक्ष) आदी बहुसंख्येने उपस्थित होते.

## तेलुगू ग्रंथालयाचा वर्धापन दिन साजरा

✔ **सोलापूर** : तेलुगू भाषा अभिवृद्धी सार्वजनिक ग्रंथालयम्च्यावतीने कै. गिडुगू राममूर्ती पंतुलू यांचा जन्मदिवस व तेलुगू भाषा दिन व तेलुगू भाषाअभिवृद्धी सार्व. ग्रंथालयम्च्या २५व्या वर्धापन दिनानिमित्त श्रीकृष्ण मंदिर सभागृहात कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. माजी महापौर कांचना यन्नम व प्रमुख पाहुणे आ. प्रणिती शिंदे यांच्या उपस्थितीत कौन बनेगा करोडपतीमध्ये भाग घेऊन साडेबारा लाख रुपय मिळवलेले आनंद राजू कुरापाटी व तेलुगू माध्यमध्ये इ. १०वी मध्ये पास झालेले विद्यार्थी यांना प्रथम व द्वितीय, तृतीय विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आले.

## अधिकारी कला मंचतर्फे ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार



✔ **सुराज्य/सोलापूर** : स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त शासकीय अधिकारी व कर्मचारी कला क्रीडा मंचातर्फे शासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या ७५ वर्षांपुढील अशा १६३ ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान नसीमा पठाण ज्येष्ठ साहित्यिका, स. वा. उंब्रजकर, अध्यक्ष पेन्शनर्स असोसिएशन व दत्ता गायकवाड ज्येष्ठ साहित्यिक, विठ्ठल अभंगराव निवृत्त नायब तहसीलदार तसेच नागनाथ माळवदकर निवृत्त नायब तहसीलदार, या मान्यवरांच्या हस्ते गौरवपत्र, शाल, बुके देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमापूर्वी डॉ. राजीव मोहोळकर यांनी गाणी गाऊन आपल्या मंत्रमुग्ध आवाजाने उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाची प्रस्तावना संस्थापकअध्यक्ष आशुतोष नाटकर यांनी केले. याप्रसंगी सलग अठरा तास काव्यवाचन करुन विश्वविक्रम करणारे कवी प्रशांत राजे व राजे मोहोळकर यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सोलापूर जिल्हा पेन्शनर्स असोसिएशन संघटनेचे योगदान लाभले.

## बाबू जगजीवनराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करा

✔ सुराज्य/सोलापूर

जाबमुनी मोची समाजसेवा मंडळ शहर व जिल्हा संघटना यांच्यावतीने जिल्हा अध्यक्ष देवेंद्र भंडारे यांच्या नेतृत्वाखाली समाजाच्या विविध मागण्यांवर एक दिवसाचे धरणे आंदोलन जिल्हा परिषद, पूनम गेट येथे करण्यात आले.

जांबमुनी मोची समाजाचे जिल्हा अध्यक्ष देवेंद्र भंडारे यांनी आपल्या भाषणात म्हणाले की, 'महाराष्ट्र राज्यात मोची, मादिगा, मादगी, मादर समाज मोठ्या प्रमाणात असून समाजाची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक प्रगतीकरता व बेरोजगार युवकांना व महिलांना रोजगार मिळण्याकरिता स्वातंत्र्य बाबू जगजीवनराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन केले पाहिजे. जातीचा दाखला मिळण्याकरिता १९५० पूर्वीचा पुरावा देणे ही जाचक अट शिथील केली पाहिजे. युवा नेते स्व. करण म्हेत्रे यांच्या अंत्यविधीमध्ये सामील झालेल्या २५० समाज बांधवांवर ३५३ कलमान्वये गुन्हा दाखल झाला आहे तो रद्द झाला पाहिजे. वरील समाजाला शासनाकडील गायरान जमीन प्रत्येक आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या लोकांना ५ एकर जमीन मिळाली पाहिजे. राज्यशासन व केंद्रशासन कर्ज योजना त्वरित मिळाली पाहिजे, जांबमुनी रथोत्सव मिरवणुकीस रात्री १२ वाजेपर्यंत परवानगी मिळाली पाहिजे आदी विषयांवर प्रश्न मांडले.'

## जांबमुनी मोची मंडळाचे पदाधिकारी जाहीर

✔ सुराज्य/सोलापूर

श्री जांबमुनी मोची समाजसेवा मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा समाजाचे माजी अध्यक्ष हनुमंत सायबोळू यांच्या अध्यक्षतेखाली होऊन सन २०२३-२४ सालाकरिता खालील नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.



अध्यक्ष करेप्पा मारेप्पा जंगम, उपाध्यक्ष दत्तू हनुमंत आसादे, सेक्रेटरी रवी सायण्णा म्हेत्रे, सहसेक्रेटरी कपिल हेमंत पुंडा, खजिनदार लिंगराज सिद्राम पल्लेलू, ऑडिटर सागर विजयकुमार शिंगे, न्यायअध्यक्ष नरसिंग सायण्णा म्हेत्रे, उपन्यायाध्यक्ष श्रीनिवास मारेप्पा म्हेत्रे, विवाह अध्यक्ष, अंजन हनुमंत मिसाळ उपविवाहअध्यक्ष, क्रीडा व सांस्कृतिक अध्यक्ष भास्कर तिरुपती फुले, क्रीडा व सांस्कृतिक उपाध्यक्ष आनंद देवेंद्र भंडारे, चेअरमन श्री जांबमुनी प्रशालेचे अध्यक्ष वाबळेश मरगप्पा म्हेत्रे, व्हाईस चेअरमन पांडुरंग व्यंकटेश म्हेत्रे, प्रशालेचे सचिव नागेश नरसिंग म्हेत्रे, चेअरमन श्री जांबमुनी प्राथमिक शाळेचे अशोक किसान सायबोळू, प्राथमिक शाळेचे व्हाईस चेअरमन अंबादास चिन्नापागोलू व्हाईस चेअरमन, सचिव मल्लिकार्जुन श्रीराम पिलगेरी.

## जागतिक छायाचित्र दिन उत्साहात साजरा



✔ सुराज्य/सोलापूर

दरवर्षीप्रमाणे यंदाही १९ ऑगस्ट हा दिवस जागतिक छायाचित्र दिन म्हणून फोटोग्राफर्स वेल्फेअर्स असोसिएशन ऑफ सोलापूर या संघटनेकडून उत्साहात साजरा केला गेला.

अक्षय ग्रँड मंगल कार्यालय येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पाचशेच्या वर छायाचित्रकार, व्हिडिओ एडिटर, अल्बम डिझायनर म्हणून यांनी उत्साहपणे सदर कार्यक्रमास हजेरी लावली व आपल्या सहकाऱ्यांचा सत्कार सोहळा साजरा केला.

सदर कार्यक्रमात संघटनेचे ज्येष्ठ छायाचित्रकार जावेद मुन्शी व शुभम गुंडला यांचा सत्कार सोलापुरातील प्रसिद्ध चित्रकार व्यंकटेश सपार यांच्या हस्ते मानपत्र, शाल व फेटा बांधून करण्यात आला. कार्यक्रमप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून जनता बँकेचे संचालक जगदीश शेठ भुतडा व प्रसिद्ध विधीज्ञ श्रीनिवास कटकूर उपस्थित होते.

यावेळी जमलेल्या उत्साही छायाचित्रकारांना सदस्य वर्गणीसाठी लकी ड्रॉचे आयोजन करण्यात आले होते. त्यास उत्स्फूर्त पाठिंबा मिळाला व उपस्थित छायाचित्रकारांनी भोजनाचा आस्वाद घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अध्यक्ष सुभाष सण्णके, सचिव रविंद्र गोगी यांनी विशेष परिश्रम घेतले. उपाध्यक्ष प्रशांत उडता, खजिनदार श्रीधर अंबाल, रवी वडनाल, गणेश विश्वनाथ, तिरुपती वग्गा, प्रशांत चिंता, बसवराज कुंभार, योगेश मच्छा, प्रवीण क्यातम, श्याम डांगे, व्यंकटेश पोतराज, गदीम हरकारे, अक्षय चिप्पा या संचालकांनी सहभाग नोंदविला.

## लष्कर मध्यवर्ती गणेशोत्सव महामंडळाची आज बैठक

✔ **सोलापूर** : लष्कर विभाग मध्यवर्ती गणेशोत्सवाची सर्वसाधारण बैठक रविवार ३ सप्टेंबर रोजी रात्री ८ वा. सदर बझार सार्वजनिक वाचनालय, दाराशा हॉस्पिटल शेजारी, सोलापूर येथे आयोजित करण्यात आले आहे. तरी सर्व सभासद, सन्माननीय सभासद, आजीव सभासद, संस्थापक वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन मंडळाचे आनंद मनसावाले व रवी माने यांनी केले आहे.

# इच्छापत्र करून चिंतामुक्त व्हा : गोडसे

✔ सुराज्य/सोलापूर

'इच्छापत्र करणे ही काळाची गरज असून ते 'मेटको'कडे रजिस्टर करणे अत्यंत सुलभ प्रक्रियेचे व अत्यंत गरजेचे आहे. इच्छापत्र करताना आपल्या सर्व स्थावर व जंगम मालमत्तेचे सर्व तपशील देऊन त्यात एक्झिक्युटर नेमून मग करावे. त्यासोबत दोन साक्षीदार व डॉक्टरचे मेडिकल सर्टिफिकेट लावावे इच्छाला स्टॅम्प ड्युटी नसते. मात्र, ते पुढील कोर्ट केसेस टाळण्यासाठी रजिस्टर करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन मेटकोचे व्यवसाय प्रमुख ऋषिकेश गोडसे यांनी केले.'

महाबँक पेन्शनर्स क्लबच्या ऑगस्ट महिन्याच्या मासिक बैठकीत ते बोलत होते. त्यांच्यासोबत मेटकोच्या युनिट प्रमुख मयूरी वाघ यांनीही ज्येष्ठ नागरिकांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. अध्यक्षस्थानी बँक ऑफ महाराष्ट्राच्या सोलापूर झोनचे झोनल व्यवस्थापक संजय वाघ हे होते.

ते पुढे म्हणाले की, 'मालमत्तेच्या तपशिलात काही बदल झाल्यास किंवा वाटपात काही बदल करावयाचा असल्यास ते पुन्हा रजिस्टर करावे. मेटको एक साधा फॉर्म भरून घेत, ज्यामध्ये इच्छापत्र करणाऱ्याचे संपूर्ण तपशील असतात. त्यासोबतच मालमत्तेचेही तपशील असतात. त्याप्रमाणे मेटको



पहिल्यांदा ड्राफ्ट करून पाठवतो. तो योग्य वाटल्यास ठीक नसल्यास त्यात इच्छापत्र करणाऱ्यांच्या मनाप्रमाणे बदलही करून देतो आणि मग तो मेटकोकडे रजिस्टर केल्यावर एक नंबर मेटकोकडून मिळतो. जर कोर्ट केस झाली तर मेटको ती केस लढते. कारण ती भारत सरकारच्या अंगीकृत उपक्रमाची एक उपकंपनी आहे. मूळ इच्छापत्र मेटकोकडे राहते. इच्छापत्र करणाऱ्यांच्या मृत्यूनंतर सेटको स्वतः त्या इच्छापत्राची अंमलबजावणी (एक्झिक्युशन) करते. दुसरी प्रत असते ती आपल्या एखाद्या तरुण नातेवाईकांकडे मित्राकडे ठेवा. समवयस्कांकडे ठेवू नका. कारण तोही मृत्यू पावू शकतो.

अगदी दागिने, सोने, शेअर्स, मुदती ठेवीच्या पावत्या, आवर्ती ठेवी, तसेच बचत खाते अशा सर्व मालमत्ता त्यात समाविष्ट करता येतात. मात्र, दोघांच्याही सोयीसाठी नवरा आणि बायको यांनी स्वतंत्र इच्छापत्रे करावीत, असा सल्ला गोडसे यांनी दिला.

प्रारंभी क्लबचे अध्यक्ष प्रसाद अतनूरकर यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन व आभार क्लबचे सचिव रवींद्र खमितकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी उपाध्यक्ष दीपक दबडे आणि कोषाध्यक्ष खंडू फुलसे यांनी प्रयत्न केले.

# महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सभेत हमरीतुमरी

✔ सुराज्य/पुणे

**साहित्य संस्थांची आद्य संस्था असलेल्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या गुरुवारी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत हमरीतुमरी पाहायला मिळाली. परिषदेची समाजमाध्यमांवर बदनामी करणाऱ्या व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करण्याच्या मुद्द्यावरून 'मसाप'च्या विचारी सभागृहाचे रूपांतर आखाड्यात झाले. साहित्यिक, विचारवंत आणि दिग्गजांच्या सहवासाने नावाजलेल्या ऐतिहासिक माधवराव पटवर्धन सभागृहात परिषदेचे सभासद एकमेकांना भिडल्याने उपस्थितांच्या भुवया उंचावल्या.**





मसापची वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष डॉ. रावसाहेब कसबे यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी झाली. परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. तानाजी चोरगे आणि राजीव बर्वे, कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, कोषाध्यक्ष सुनीताराजे पवार उपस्थित होते. परिषदेची समाजमाध्यमांवर बदनामी करणाऱ्या व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा जोशी यांनी देताच सभेत वादाची ठिणगी पडली. सभासद विजय शेंडगे आणि राजकुमार धुरगुडे-पाटील यांनी कार्याध्यक्षांच्या भूमिकेवर आक्षेप घेताच काही सभासदांनी त्यांना विरोध केला. काहींनी मध्यस्थी केल्याने हमरीतुमरीचे रूपांतर हाणामारीत झाले नाही. या गोंधळामुळे 'लोकशाहीचे दर्शन घडले,' अशी टिप्पणी डॉ. रावसाहेब कसबे यांनी केली.

'कार्यकारिणीला पाच वर्षांच्या मिळालेल्या मुदतवाढीवर आम्ही आक्षेप घ्यायचा नाही काय, सभासदांना व्यक्त होण्याचा अधिकार नाही का,' असे प्रश्न विजय शेंडगे आणि राजकुमार धुरगुडे यांनी उपस्थित केले. यावर जोशी यांनी 'कार्यकारी मंडळाने लोकशाहीविरोधी काहीही केले नाही,' असे स्पष्ट केले. पुरस्कार न दिल्याने पदाधिकाऱ्यांना जाब विचारणाऱ्यांची नावे जाहीर करण्याची भूमिका जोशी यांनी घेताच वाद आणखी पेटला. सभासदांना बोलू न देण्याच्या कार्यपद्धतीमुळे हीच का लोकशाही, अशा शब्दांत शेंडगे यांनी टीकास्त्र सोडले. साहित्य परिषदेच्या कामाबाबतच्या शंका सुसंस्कृत पद्धतीने विचाराव्या. साहित्य परिषदेचा सभासद होण्यासाठी पहिली पात्रता सुसंस्कृत असण्याची आहे, अशी टिप्पणी कसबे यांनी केली.

## विचारवंतांनी गाजवलेल्या सभागृहाचे रूपांतर आखाड्यात

### घटना दुरुस्ती होणार

'पुढील पन्नास वर्षांचा विचार करून येत्या मार्चपर्यंत घटना दुरुस्ती होणार आहे. घटना समितीने हा अहवाल कार्यकारी मंडळाला दिला आहे. परिषदेच्या आजीव सभासदांची संख्या २० हजारांहून अधिक असल्याने यापुढे परिषदेच्या कार्यक्रमांना उपस्थित राहणाऱ्या क्रियाशील कार्यकर्त्यांनाच सभासदत्व देण्यात येणार आहे. परिषदेच्या निष्क्रिय शाखांचे विलीनीकरण उपक्रमशील शाखेमध्ये करण्यात येणार आहे,' अशी माहिती कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी दिली. महाराष्ट्र साहित्य पत्रिकेतील शंभर वर्षांतील निवडक लेख आणि संमेलनाध्यक्षांची भाषणे हा प्रकल्प लवकरच पूर्ण होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

दोन वर्षांपूर्वी झालेल्या सभेत कार्यकारिणीला पाच वर्षांच्या मुदतवाढीचा ठराव मंजूर झाला होता.

या कार्यकारिणीने चांगले काम केले नाही, तर राजीनामा देईन, असे मी म्हणालो होतो. मात्र, हे पदाधिकारी चांगले काम करीत असल्याने राजीनाम्याचा प्रश्न येतोच कुठे?

**- डॉ. रावसाहेब कसबे,** अध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य परिषद.

## ▶▶ क्राईम न्यूज....

### सकाळीच बत्ती गुल झाल्याने ग्राहकांचा संताप

✔ **नागपूर :** राज्यात शनिवारी (२ सप्टेंबर) सकाळी महावितरणची विजेची शिखर मागणी शुक्रवारच्या तुलनेत कमी झाली. त्यानंतरही सुमारे १,२०० मेगावॅटचा तुटवडा निर्माण झाल्याने राज्यभरातील 'जी' गटातील फिडरवर तब्बल दीड तासांचे आपत्कालीन भारनियमन केले गेले. सकाळीच बत्ती गुल झाल्याने अनेक भागात वीज ग्राहकांनी महावितरणवर संताप व्यक्त केला. तर महावितरणकडून ग्राहकांना अखंडित वीज पुरवठा व्हावा म्हणून विजेची जुळवा- जुळव सुरू असून त्यानंतर अथवा अनुमानानुसार राज्यात पाऊस पडल्यास मागणी कमी होऊन भारनियमन बंद होणार असल्याचा दावा केला जात आहे.

### 'खिचडी' प्रकरणी गुन्हा दाखल

✔ **मुंबई :** कोरोना काळात महापालिकेकडून करण्यात आलेल्या खिचडी वितरणाप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेने गुन्हा दाखल केला आहे. खासदार संजय राऊत यांचे विश्वासू सुजीत पाटकर यांच्यासह सहा जणांविरोधात हा गुन्ह दाखल करण्यात आला असून याप्रकरणी सहा कोटी ३७ लाख रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप आहे. आग्रीपाडा पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यात फसवणूक, फौजदारी विश्वासघात, कट रचणे, आदी कलमांर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुनील ऊर्फ बाळा कदम, सह्याद्री रिफ्रेशमेंटचे राजीव साळुंके, सुजीत पाटकर, फोर्सव मल्टी सर्व्हिसेसचे भागिदार व कर्मचारी, स्नेहा कॅटरर्स, तत्कालीन सहाय्यक आयुक्त, इतर पालिका अधिकारी व संबंधीतांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

### 'ॲट्रॉसिटी'चे संरक्षण देशव्यापी

✔ **मुंबई :** अनुसूचित जाती आणि जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत (ॲट्रॉसिटी) मिळणारे संरक्षण देशव्यापी आहे, त्याला राज्यांची सीमा घातली जाऊ शकत नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा उच्च न्यायालयाच्या पूर्णपीठाने शुक्रवारी दिला. शिवाय, ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत दाखल केलेली सर्व अपिले ही उच्च न्यायालयाच्या एकलपीठापुढेच चालवली जातील, असा निर्वाळाही पूर्णपीठाने दिला. एखाद्या राज्यात अनु. जाती आणि जमातीत मोडणारी जात अन्य राज्यात याच श्रेणीत मोडते असे नाही. त्यामुळे एका राज्यात अनु. जाती आणि जमातीत मोडणाऱ्या व्यक्तीला दुसऱ्या राज्यात कायद्यांतर्गत मिळणारे संरक्षण दिले जात नाही. याबाबतचा मुद्दा उच्च न्यायालयाच्या पूर्णपीठाकडे सुनावणीसाठी आला होता. न्यायमूर्ती रेवती डेरे, न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्यायमूर्ती निजामुद्दीन जमादार यांच्या पूर्णपीठाने एकमताने निकाल देताना उपरोक्त महत्त्वपूर्ण निर्णय दिला.

### दीड कोटी निरक्षर शोधण्याचे लक्ष्य

✔ **पुणे :** केंद्र सरकारने पाठवलेल्या निरक्षरांच्या संख्येनुसार गावागणिक निरक्षरांची ठराविक संख्या शोधण्याची उलट गंगा सध्या शिक्षण विभागात वाहते आहे. राज्यात एकूण एक कोटी ६३ लाख निरक्षर नागरिक असल्याची गावनिहाय आकडेवारी केंद्राने पाठवली आहे. त्यानुसार आता प्रत्येक गावातील निरक्षरांचा शोध घ्या, असे फर्मान स्थानिक पातळीवरील अधिकाऱ्यांनी शाळांसाठी काढले आहे. पुढील चार वर्षांत पाच कोटी नागरिकांना साक्षर करण्याचे उद्दिष्ट केंद्र सरकारने ठेवले आहे. त्यापैकी १२ लाख ४० हजार नागरिकांना साक्षर करण्याचे लक्ष्य महाराष्ट्राला दिले आहे. राज्यस्तरावर अगदी दीड कोटी नाही, पण १२ लाख ४० हजारांचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी तेवढे निरक्षर शोधण्याचे काम शिक्षण विभागाला करावे लागणार आहे.

### 'महेंद्रगिरी' युध्दनौकेचे जलावतरण

✔ **मुंबई :** माझगाव डॉक शिप बिल्डर्समध्ये (एमडीएल) बांधणी करण्यात आलेल्या 'महेंद्रगिरी' या युद्धनौकेचे जलावतरण उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या पत्नी डॉ. सुदेश धनखड यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले. 'महेंद्रगिरी' ही भारतीय नौदलाच्या प्रकल्प १७ ए अंतर्गत सातवी आणि एमडीएलकडून बांधण्यात आलेली चौथी विनाशिका आहे. कार्यक्रमाला राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे, नौदलप्रमुख ॲडमिरल आर. हरि कुमार आणि 'एमडीएल' चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक संजीव सिंघल यांच्यासह संरक्षण मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी, भारतीय नौदल आणि 'एमडीएल'चे कर्मचारी उपस्थित होते.

### बनावट तुकडी दाखवून अनुदान लाटले

✔ **पुणे :** बनावट तुकडी दाखवून सरकारी अनुदान लाटण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी तत्कालीन उपशिक्षणाधिकाऱ्यांसह तिघांविरुद्ध समर्थ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी तत्कालीन उपशिक्षणाधिकारी दिलीप थोरे, भोसरी येथील सु. ना. बारसे माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका वंदना लढे आणि संस्था व्यवस्थापक यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत उपशिक्षणाधिकारी अनंत दाणी (वय ५२) यांनी समर्थ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांकडे बारसे विद्यालयातील तुकडी अनुदानाबाबत तक्रार करण्यात आली होती.

### औषध विक्रेत्याची ५० लाखांची फसवणूक

✔ **डोंबिवली :** येथील एका औषध विक्रेत्याला तुम्ही शेअर बाजारात गुंतवणूक करा. आम्ही त्या गुंतवणुकीतून दामदुप्पट लाभ मिळून देतो, असे आश्वासन देऊन तीन भामट्यांनी गेल्या पाच महिन्याच्या काळात येथील एका औषध विक्रेत्याची ५० लाखाची फसवणूक केली. गिरीशकुमार चम्पालाल व्यास (३६) अशी फसवणूक झालेल्या औषध विक्रेत्याचे नाव आहे. त्यांनी मोहित शर्मा, रिचा गुप्ता आणि अंगद या तीन भामट्यांविरुध्द विष्णुनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. ऑनलाईन व्यवहारातून ही फसवणूक झाली आहे.

### महिलेची एकवर्षीय मुलीसोबत आत्महत्या

✔ **ठाणे :** घोडबंदर येथील कासारवडवली भागात शुक्रवारी मध्यरात्री प्रियंका मोहिते (२६) हिने तिच्या एक वर्षीय मुलीसोबत सहाव्या मजल्यावरून खाली उडी मारून आत्महत्या केल्याची घटना घडली. याप्रकरणी आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. प्रियंकाचे पती रक्षाबंधनासाठी तिला माहेरी जाऊ देत नव्हते. तसेच त्यांच्यामध्ये किरकोळ कारणावरून वादाचे प्रसंग उद्‌भवत होते. त्यामुळे प्रियंकाने तिच्या मुलीसोबत आत्महत्या केली असावी, असा प्राथमिक अंदाज पोलीस वर्तवित आहेत.

### अल्पवयीन प्रेमीयुगलांनी केली आत्महत्या

✔ **कोल्हापूर :** सोशल मीडियावर पोस्ट करीत भिन्नधर्मीय अल्पवयीन प्रेमीयुगुलांनी आत्महत्या केल्याचा प्रकार पुलाची शिरोली (तालुका हातकणंगले) येथे घडला. सानिका नानासाहेब निकम (वय १६) आणि अरबाज शब्बीर पकाले (वय १८, रेणुका नगर शिरोली पुलाची) असे आत्महत्या केलेल्या प्रेमीयुगुलाचे नाव आहे. सानिया-अरबाज या अल्पवयीन युवतींचे एकमेकांवर प्रेम होते. मात्र या प्रेमाला दोन्हीकडील कुटुंबीयांचा विरोध होता. हे प्रेमाचे नव्हे; शिक्षणाचे वय आहे, अशी त्यांची समजूत घातली जात होती. मात्र तरीही हे प्रेमीयुगल आपल्या मतावर ठाम होते. कुटुंबियांच्या विरोधाला त्यांनी दाद दिली नव्हती. यातूनच त्यांनी जीवन संपवण्याचा धाडसी पण दुर्दैवी निर्णय घेतला होता.

## चंद्रानंतर आता 'इस्रो'चा सूर्य नमस्कार

### आदित्य 'एल १'चे प्रक्षेपण; १५ लाख किलोमीटरचा करणार प्रवास

✔ सुराज्य/नवी दिल्ली

चांद्रयान-3 च्या यशस्वी मोहिमेनंतर भारतीय अंतराळ संस्था (इस्रो) आता सूर्याकडे झेप घेत आहे. सूर्याच्या अभ्यासासाठी आदित्य 'एल १' अंतरयान श्रीहरिकोटा येथून शनिवारी (२ सप्टेंबर) ११ वाजता प्रक्षेपित होत आहे. लाँचिंगच्या १२७ दिवसांनी यान एल-१ अचूक कक्षेपर्यंत पोहचेल. यानंतर सूर्याच्या अभ्यासाद्वारे आकाशगंगेतील तसेच इतर विविध आकाशगंगांमधील ताऱ्यांबद्दल बरीच माहिती मिळवता येईल, असं इस्रो'नं सांगितलं आहे.

पीएसएलव्ही सी ५७' हा शक्तिशाली वाहक आदित्य एल १ यानाला घेऊन अंतराळात झेपावणार आहे. पृथ्वीपासून सुमारे १५ लाख किलोमीटरवरील 'एल १' (सूर्य-पृथ्वी लॅग्रॅन्जिअन पॉइंट) येथील सौर वारे आणि सूर्याचे प्रभामंडल यांचे दूरस्थ निरीक्षण करण्यासाठी आदित्य 'एल १'ची रचना करण्यात आली आहे.



पृथ्वी आणि सूर्य यांचे गुरुत्वीय बल संतुलित राहतील, असे पाच बिंदू (लॅग्रॅन्जिअन पॉइंट) आहेत. त्या बिंदूंवरून सूर्याचा अभ्यास करणे विशेष व महत्त्वाचे असते. त्यातील 'एल १' या बिंदूचा वापर आदित्य 'एल १' या मोहिमेत केला जाणार आहे. सूर्यामुळे उद्रेकाच्या अनेक घटना घडतात. तो सौर मंडळामध्ये प्रचंड प्रमाणात ऊर्जा उत्सर्जित करतो. अशा प्रकारच्या स्फोटक सौर घटना घडल्या तर पृथ्वीजवळच्या अवकाशात विविध प्रकारचे परिणाम संभवतात, असे संशोधकांचे मत आहे.

सूर्याच्या अभ्यासासाठीच्या मोहिमेची घोषणा इस्रोने २००८ मध्ये केली. आतापर्यंत नासा, युरोपियन स्पेस एजन्सी अशा मोजक्या देशांतील संशोधन संस्थांनी अंतराळातील सौर मोहिमा केल्या आहेत.

दरम्यान, सूर्याच्या बाह्य भाग फोटोस्फिअर येथील तापमान ५५०० अंश सेल्सिअस असतं. तर, सूर्याच्या केंद्रबिंदूचे तापमान १.५० कोटी अंश सेल्सिअस आहे. त्यामुळे कोणतंही यान सूर्याच्या जवळ जाऊ शकत नाही.

## सुधीर मोरे यांची आत्महत्या; निकटवर्तीय महिलेवर गुन्हा



✔ **मुंबई :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे माजी नगरसेवक सुधीर मोरे यांनी धावत्या रेल्वेसमोर उडी घेत आत्महत्या केली. गुरुवारी रात्री मुंबईतील विक्रोळी-घाटकोपर रेल्वे स्थानकांदरम्यान हा प्रकार घडला. त्यांच्या मुलाच्या जबाबाच्या आधारे कुर्ला रेल्वे पोलिसांनी शुक्रवारी मोरेंच्या निकटवर्तीय महिलेविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला.

६२ वर्षीय सुधीर मोरेंचा मुलगा समर मोरे यांनी पोलिसांना सांगितले की आईच्या निधनानंतरही वडील मानसिकदृष्ट्या खंबीर होते, परंतु एका वकील महिलेने त्यांना सातत्याने मारहाण करत टोकाचं पाऊल उचलण्यास भाग पाडलं. ती राज्य सरकारने स्थापन केलेल्या वैधानिक समितीशी संबंधित असल्याची माहिती आहे.

शुक्रवारी विक्रोळी पार्कसाइटमधील दुकानं बंद ठेवण्यात आली होती. पाचशेहून अधिक नागरिक सुधीर मोरे यांच्या अंतिम दर्शनासाठी जमले होते.

## पत्नीची हत्या केल्यानंतर पतीला हार्ट ॲटॅक

✔ सुराज्य/ठाणे

पत्नीची हत्या केल्यानंतर पतीचा हृदयविकाराच्या धक्क्याने मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ठाणे शहराजवळील कळवा भागात शुक्रवारी रात्रीच्या सुमारास हा प्रकार उघडकीस आला आहे. पत्नीच्या हत्येनंतर पतीच्या मृत्यूचा प्रकार घडल्याने सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे.



कळव्यातील कुंभार आळी परिसरातील यशवंत निवासमध्ये राहणाऱ्या दिलीप साळवी यांनी आपली पत्नी प्रमिला साळवी हिच्यावर स्वतःच्या बंदुकीतून गोळ्या झाडून हत्या केली. दिलीप साळवी हे माजी उपमहापौर गणेश साळवी यांचे बंधू, राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक मिलिंद साळवी यांचे मावसभाऊ, तर माजी नगरसेविका अपर्णा साळवी यांचे दीर होते. घटनेची माहिती मिळताच परिमंडळ एकचे पोलीस उपायुक्त गणेश गावडे यांनी घटनास्थळी भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला.

## जादा परताव्याच्या अमिषाने सहा लाखांची फसवणूक

✔ सुराज्य/नाशिक

शेअर बाजारातील गुंतवणुकीवर जादा परतावा देण्याचे आमिष दाखवित संशयितांनी एकाला सहा लाखांना गंडा घातल्याचे उघड झाले आहे. याबाबत राहुल पाटील (पोकार कॉलनी, दिंडोरीरोड) यांनी तक्रार दिली. २३ जुलै रोजी ९६६९४९६२२८ या भ्रमणध्वनी धारकाने पाटील यांच्याशी संपर्क साधला होता. अल्गो ट्रेडिंगमध्ये गुंतवणूक केल्यास मोठा नफा मिळवून देण्याचे त्याने आमिष दाखविले. त्याच्या भूलथापांना पाटील बळी पडले. ३ ऑगस्टपर्यंत पाटील यांनी संशयिताने सांगितलेल्या बँक खात्यांवर पाच लाख ७३ हजार ३५० रुपये भरले. मात्र नंतर संशयिताने शेअर बाजारात गुंतवणूक न करताच परस्पर अपहार केल्याचे लक्षात आल्यावर पाटील यांनी पोलिसात धाव घेतली. या प्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात फसवणूक व माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## दगडफेक, तणाव आणि कडकडीत बंद

### धाराशिव शहरासह जिल्ह्यात सकल मराठा समाज आक्रमक

✔ सुराज्य/जालना

जालना जिल्ह्यात पोलिसांनी मराठा आंदोलकांवर केलेल्या लाठीचार्जच्या निषेधार्थ धाराशिव शहरासह जिल्हाभरात कडकडीत बंद पाळण्यात आला. शहरातील शम्स चौक आणि नगर पालिका परिसरात काही तरुणांनी दगडफेक केल्यामुळे तणाव निर्माण झाला होता. पोलिसांनी त्यावर तात्काळ नियंत्रण मिळविले. शहरातील मुख्य रस्त्यांवरून एक मराठा लाख मराठा' आशा घोषणा देत तरुणांचे घोळके शहर बंद करण्याचे आवाहन करीत होते. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाने शहरात मोठा फौजफाटा तैनात केला होता.

मराठा आरक्षणासह विविध मागण्यांसाठी



जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे सुरू असलेल्या आंदोलनावर पोलिसांनी लाठीचार्ज केला त्याच्या निषेधार्थ शनिवारी जिल्ह्यांतील अनेक गावांनी उत्स्फूर्तपणे कडकडीत बंद पाळला आहे.

कळंब आणि उमरगा तालुक्यातील सकल मराठा समाजाच्या वतीने बंद पाळून जालना येथील घटनेचा निषेध नोंदवला. राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने बंदच्या पार्श्वभूमीवर सर्व बसगाड्या बंद ठेवल्या होत्या. अचानक बसगाड्या बंद ठेवल्यामुळे प्रवाशांना गैरसोयीचा सामना करावा लागला. जिल्ह्यातील जवळपास सर्वच बस स्थानकात कडकडीत बंद स्पष्टपणे दिसून आला.

उमरगा तालुका सकल मराठा समाजाच्यावतीने उमरगा शहर व तालुक्यातील विविध गावात कडकडीत बंद पाळण्यात आला. कोणतीही अप्रिय घटना घडू नये म्हणून बसेसची वाहतूक पूर्णपणे बंद ठेवण्यात आली होती. पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवल्यामुळे बंद दरम्यान अनुचित प्रकार घडला नाही. रात्री उशिरापासूनच उमरगा बंदचे आवाहन समाजमाध्यमातून करण्यात आले होते. व्यापारी महासंघाने बंदला पाठिंबा दिल्याने व्यापाऱ्यांनी स्वतःहून आपली दुकाने बंद ठेवली होती. तहसीलदार गोविंद येरमे यांना निवेदनात देऊन निषेध व्यक्त करण्यात आला.

## लाचप्रकरणी वनपाल, वनरक्षक जाळ्यात

✔ सुराज्य/कोल्हापूर

ट्रकमधील लाकडाची तपासणी न करण्यासाठी २० हजार रुपयांची लाच स्वीकारल्याप्रकरणी हातकणंगले तालुक्यात वनपाल व वनरक्षक यांना गुरुवारी रंगेहाथ पकडण्यात आले.

रॉकी केतन देसा (पद - वनपाल नेमणूक, प्रभारी परिमंडळ वनाधिकारी कार्यालय, हातकणंगले) व मोहन आत्माराम देसाई (पद -वनरक्षक. नेमणूक - हातकणंगले) अशी त्यांची नावे आहेत. तक्रारदार यांचा जळाऊ लाकडांचा खरेदी विक्रीचा व्यापार आहे. तक्रारदार हे जत (सांगली), सांगोला (सोलापूर) येथून जळावू लाकूड खरेदी करून ते भाड्याने घेतलेल्या गाड्यांमध्ये भरून विक्रीसाठी आणतात.

यावेळी गाड्या मधील लाकडाची तपासणी न करण्यासाठी २० हजार रुपये लाचेची मागणी केली. तसेच त्याने ही रक्कम वनरक्षक देसाई याचेकडे देण्यास सांगितले होते. त्यानुसार शनिवारी सापळा रचला असता म्हणून रक्षक देसाई यांनी २० हजार रुपये लाचेची रक्कम स्वीकारल्यानंतर रंगेहाथ पकडण्यात आले.



## आधी कुटुंब सांभाळा मग घराणेशाहीवर बोला

### ▶▶ पंतप्रधान नरेंद्र मोदींना उद्धव ठाकरेंचा टोला

✔ सुराज्य/पुणे

गेल्या काही दिवसांपासून घराणेशाही घराणेशाही म्हणून आपल्यावर बोललं जातं आहे. मी पण ज्यांनी कुटुंब व्यवस्था नाकारली त्यांना घराणेशाही कशी कळणार? असं म्हणत उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका केली आहे. तसंच जालना लाठीचार्ज प्रकरणावरुनही उद्धव ठाकरेंनी सरकारवर टीका केली. तसंच हुकूमशाही चिरडून टाकण्यसाठीच आम्ही इंडिया म्हणून एकत्र आल्याचंही उद्धव ठाकरेंनी सांगितलं. शिवसेना ठाकरे गटाच्या होऊ द्या चर्चा या कार्यक्रमात उद्धव ठाकरेंनी जे भाषण केलं त्या भाषणात त्यांनी मोदींना टोला लगावला.

**काय म्हणाले उद्धव ठाकरे?**

हुकूमशाही देशात आणणारा हुकूमशहा आम्हाला जन्मालाच येऊ द्यायचा नाही. अनेक वर्षांच्या संघर्षानंतर स्वातंत्र्य मिळालं. अनेक क्रांतिकारक फासावर गेले, अनेकांनी प्राणांची आहुती दिली त्यानंतर हे स्वातंत्र्य मिळालं. आजही घराणेशाही-घराणेशाही म्हणत जो काही एक उद्घोष चालला आहे घराणेशाहीच्या आम्ही विरोधात आहोत असं सांगत आहेत. मी तुमच्या घराण्याबद्दल विचारतच नाही कारण तुम्हाला सांगायला घराण्याचा इतिहासच नाही. जे लोक कुटुंब व्यवस्था नाकारतात त्यांनी दुसऱ्याच्या घराणेशाहीवर बोलू नये. त्यांना तो अधिकारच नाही. कुटुंब व्यवस्था, घराणं ही आमच्या हिंदूंची संस्कृती आहे. तिच्या मुळावर तुम्ही घाव घालणार आणि आमच्या घराण्यावर बोलणार? आधी कुटुंब सांभाळा मग आमच्या घराण्यावर बोला. असं म्हणत उद्धव ठाकरेंनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना टोला लगावला आहे.

**बाळासाहेबांचा तो किस्सा**

या सरकारने आता गॅस सिलिंडर स्वस्त केला आहे. मला आजही आठवतं आहे २०१२ हे वर्ष होतं. तेव्हा सुषमा स्वराज यांनी मला फोन केला भारत बंद करायचा आहे. मी बाळासाहेबांना विचारलं, मला म्हणाले गणपतीच्या दिवशी? छट् त्यांना सांगून टाक आम्ही गणपतीचा सण असताना भारत बंद वगैरे काही आंदोलन करत नाही. त्याही वेळा गणपतीच्या दिवसात यांनी भारत बंद केला होता. मी त्या आंदोलनाला गेलो आणि दुसऱ्या दिवशी माझा फोटो आला गॅस सिलिंडर हातात घेतलेला. त्यानंतर मला बाळासाहेबांनी मला झापलं अरे तुझी अँजिओप्लास्टी झाली आणि तू सिलिंडर कसा काय घेतलास हातात. बाळासाहेब माझ्यावर चिडलेच होते. मग मी त्यांना सांगितलं जरा थांबा माझं ऐका अहो तो थर्माकोलचा सिलिंडर होता असं मी बाळासाहेबांना सांगितलं. मग ठीक आहे असं बाळासाहेब मला म्हणाले. त्याही वेळा गॅस सिलिंडरचं आंदोलन गणपतीच्या दिवसात केलं होतं. त्यावेळी गॅसचा दर काय होता? आज काय आहे? बघा. पाच वर्षे लुटायचं आणि दोनशे रुपयांची सूट द्यायची. हे सगळे जुमले आहेत त्यावर यांनी इमले बांधले आहेत जे आपल्याला मोडून काढायचे आहेत.

# लाठी चार्जचा सर्वपक्षीय नेत्यांकडून निषेध

सुराज्य/सोलापूर

**मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून करण्यात येणाऱ्या आंदोलकांवर पोलीस प्रशासनाने लाठी आणि बंदुकीचा वापर करुन आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला. अबाल वृध्द, महिला, पुरुष, लहान मुले यांच्या अमानुषपणे लाठीहल्ला केला. या घटनेचे पडसाद राज्यभर उमटले आहेत. सोलापुरात देखील या घटनेचा सर्व पक्षीय नेत्यांनी निषेध केला असून दोषींवर कारवाई करण्यात मागणी केली आहे.**




### कुणाच्या आदेशाने लाठीचार्ज : सिध्दाराम म्हेत्रे

जालना जिल्ह्यातील सराटी येथे शांततेच्या मार्गाने आंदोलन सुरु होते. येथे पोलिसाचा मोठा फौजफाटा घेऊन आंदोलनकर्त्यांवर अमानुष लाठीचार्ज झाला व गोळीबार झाला. हे कुणाच्या आदेशाने झाले, याचा शोध लागला पाहिजे, अशी मागणी माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांनी केला आहे.

### ही तर ब्रिटिशांची अवलाद : महेश कोठे

शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या मराठा समाजातील युवकांवर जो अमानुष लाठीचार्ज झाला तो अमानवी आहे, असे स्पष्ट करुन माजी महापौर महेश कोठे म्हणाले, पूर्व भारतावर ब्रिटिशांनी राज्य केले. ते अमानवी होते. आता त्यांची अवलाद ब्रिटिशांची हिस्टरी चालवित आहेत की काय?, असा प्रश्न आहे.

### आम्ही जितके संवदेनशील तितके स्फोटक : शिंदे

आरक्षणासाठी शांततेत आंदोलन सुरु असताना पोलिसांनी त्यांच्या का लाठीचार्ज केला?, अस सवाल करीत महाराष्ट्र जितका संवेदनशील आहे तितका स्फोटकही आहे, असे सांगत शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा प्रमुख अमोल शिंदे म्हणाले, पोलीस अधिकाऱ्यांच्या मस्तवालपणामुळे ही दुर्दैवी घटना घडली.

### ... हा तर इगो हर्ट : चेतन नरोटे

मराठा समाजातील युवकांवर पोलिसांनी जो लाठीचार्ज व गोळीबार केला तो निदंनीय आहे, असे सांगत शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे म्हणाले, याप्रकरणी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांचा इगो हर्ट झाला आहे.

### गृहमंत्री फडणवीस यांनी राजीनमा द्यावा

सराटी येथे मराठा आरक्षणासाठी बेमुदत उपोषणाला बसलेल्या व तेथे जमलेल्या आंदोलनकर्त्यावर लहान मुलासह,महिलांवर झालेला हल्ला हा सरकाच्या सांगण्यावरून गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे झाला आहे. या घटनेला गृहमंत्री जबाबदर आहेत. नैतीक जबाबदारी स्विकारत फडणवीस यांनी राजीनाम द्यावा.

– **पुरूषोत्तम बरडे** (जिल्हाप्रमुख शिवसेना ठाकरे गट)

### शासनाचे कुटील कारस्थान

पोलिस प्रमुखांनी आंदोलकांवर लाठीचार्ज केला यात महिला वृद्धांना ही बेहद्द मारहाण केली. शांत आणि संयमी समाजाला चेतावण्याच, त्याच उद्रेक होवून समाजाला रस्त्यावर येण्यास प्रेरित करत आहेत. सार्वजनिक अशांतता, अस्वस्थता आणि सुव्यवस्था बिघडवून समाजाला इतर समाजाच्या रोषाला सामोरे जाण्यासाठी भाग पाडण्याच कुटिल कारस्थान शासन आणि प्रशासन करत आहे. आंदोलनाचा भडका उडावा यात वित्तहानी जिवीतहानी व्हावी असं शासनास अभिप्रेत आहे का याची शंका वाटते.

– **राम गायकवाड** (मराठा सेवा संघ)

### सरकारची चाल ओळखा

आरक्षणाच्या विरोधात भाजपा आणि त्यांच्या सोबत असलेल्या मित्र पक्षाकडून घेतली जात असलेली भूमिका, आंदोलनकर्त्यावर अमानुष पद्धतीने केला जाणारा लाठीचार्ज, त्यांच्या सरकारमधील मंत्र्यांकडून सातत्याने केली जाणारी बेताल आणि आरक्षण विरोधी वक्तव्य त्यामुळे शिंदे –फडणवीस –पवार सरकारची ही राजकीय चाल वेळीच ओळखून त्यांना त्यांची जागा मराठा आरक्षणासाठी लढणाऱ्या समाज बांधवानी दाखवाली

– **प्रा. काकासाहेब कुलकर्णी** (राज्य प्रवक्ते काँग्रेस)

### समाज बांधवांनी एकी दाखवावे

आंदोलन मोडून काढण्यासाठी पोलिसांनी केलेला अमानुष लाठीचार्ज निषेधार्त मराठा समाजाच्या वतीने करण्यात येणाऱ्या रस्ता रोको आंदोलनात सर्व समाज बांधवानी एकी दाखवत सामिल व्हावे, सरकारचा आणि हल्लाचा निषेध नोंदवा..

– **राजन जाधव** (सकल मराठा समाज समन्वयक)

### मोदीखाना येथे काठीने मारहाण : २ महिला जखमी

**सोलापूर :** मोदीखाना परिसरातील जगजीवनराम झोपडपट्टी येथे पत्र्याच्या शेड काढण्याच्या कारणावरून झालेल्या मारहाणीत दोन महिला जखमी झाल्या. ही घटना काल शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली. उमा शंकर ढगे (वय ५५ रा.जगजीवनराम झोपडपट्टी) असे पहिल्या गटातील जखमी महिलेचे नाव आहे. त्यांना किरण जगले आणि अन्य दोघांनी मिळून काठी आणि दगडाने मारहाण केली. त्यांना शुभम (मुलगा) याने शासकीय रुग्णालयात दाखल केले. तर दुसऱ्या गटातील सुकन्या किरण जगले (वय २३ रा.सदर) ही महिला जखमी झाली. त्यांना त्याच कारणावरून विशाल ढगे, गुदप्पा ढगे आणि अन्य दोघांनी मिळून बादली आणि काठीने मारहाण केली. त्यांना किरण (पती) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले .या घटनेची नोंद सदर बाजार पोलिसात झाली आहे.

### भीमाशंकर नगरात चाकूने मारहाण; महिला जखमी

सोलापूर -घरासमोर दुचाकी लावण्याच्या किरकोळ भांडणावरून चाकू, दगड आणि फरशीने केलेल्या मारहाणीत ३६ वर्षीय महिला जखमी झाली. ही घटना नई जिंदगी परिसरातील भीमाशंकर नगरात शनिवारी सकाळच्या सुमारास घडली. यास्मिन जावेद शेख (वय ३६ रा. भीमाशंकर)असे गंभीर जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे . त्यांना उपचारासाठी पतीने शासकीय रुग्णालयात दाखल केले. आज सकाळी ९ वाजेच्या सुमारास बॉन्ड नावाचा व्यक्ती त्याच्या मुलगा, पत्नी आणि एका अन्य महिलेने त्यांना मारहाण केली. अशी नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे.

### भातंबरे येथे महिलेस मारहाण

भातंबरे (ता.बार्शी) येथे छताच्या पत्र्यावर दगड मारल्याच्या कारणावरून काठी आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत निकिता लहू जाधव (वय २७ ) ही महिला जखमी झाली. ही घटना शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली. त्यांना वैराग येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात पतीने दाखल केले. त्यांना बालाजी रामहरी राठोड आणि अन्य दोघांनी मिळून मारहाण केली. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

### कुंभारी येथे मजुरास मारहाण

कुंभारी (ता.दक्षिण सोलापूर) येथील बंदपट्टे यांच्या वीटभट्टी जवळ पगारीचे पैशाच्या कारणावरून दगड आणि लाथा बुक्क्याने केलेल्या मारहाणीत इरफान खाजाभाई पठाण (वय ५६ रा.कुंभारी) हे जखमी झाले. शुक्रवारी दुपारच्या सुमारास हा प्रकार घडला. त्यांना वळसंग येथे प्राथमिक उपचार करून घुडूभाई (भाऊ) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यांना खाजाभाई शेख आणि तुराब शेख या दोघांनी मारहाण केली. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

### गुंजेगाव येथे आत्महत्येचा प्रयत्न

गुंजेगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथे राहणाऱ्या विकास विलास ओहोळ (वय ३०) याने राहत्या घरात विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना आज शनिवारी सकाळच्या सुमारास घडली. त्याला कंदलगाव येथे प्राथमिक उपचार करून दिनकर (मामा) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही.

### नशेत तीक्ष्ण शास्त्राने स्वत: मारून घेतले

कुमठा नाका परिसरातील भारत नगरात राहणाऱ्या लखन दत्ता जाधव (वय ३७) याने दारूचा नशेत तीष्ण शस्त्राने दोन्ही हातावर वार करून घेतल्याने जखमी झाला. ही घटना शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली. त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात सचिन डोलारे (मामा) यांनी दाखल केले. या घटनेची नोंद सदर बझार पोलिसात झाली आहे.

# मराठा आंदोलनास बी.आर.एस.चा पाठिंबा

## हल्ल्याचा निषेध; जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन

सुराज्य/सोलापूर



अंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षणासाठी बेमुदत उपोषणाला बसलेल्या व तेथे जमलेल्या आंदोलनकर्त्यावर लहान मुलासह,महिलांवर देखील अमानुष लाठीमार व छऱ्यांच्या बंदूकीने गोळीबार करुन जखमी केले. या घटनेचा सर्वत्र निषेध केला जात आहे. ठिक ठिकाणी आंदोलन केले जात आहे. सोलापूरातील बीआरएस पक्षाच्या वतीने निषेध करत मराठा आंदोलनास पाठींबा जाहीर केला आहे. या प्रकरणीची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

महाविकास आघाडीच्या सरकारने पोलिस प्रशासनाला हाताशी धरुन जी दडपशाही केली त्याचा जाहीर निषेध करत तसेच मराठा आरक्षण अ दशरथ गोप यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन उपजिल्हाधिकारी विठ्ठल उमदले यांना देण्यात आले.

यावेळी बी.आर.एस पार्टीचे ज्येष्ठ नेते माजी नगरसेवक नागेश वल्याळ, संतोष भोसले.सचिन सोनटक्के,जयंत होले-पाटील,श्रीधर चिट्याल, सुकुमार सिध्दम,यशवंत ईंदापूरे, मोहसीन शेख,हाजी शहनावाज शेख,अनिल बर्वे ,तुकाराम शेंडगे, सुरेश देवणे,करीम सैय्यद,आखलाक मशालकर,अश्रफ शेख, अझहर नदाफ इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.



**उपजिल्हाधिकारी विठ्ठल उमदले यांना सकल मराठा समाजाच्या वतीने निवेदन देवून जालना येथील घटनेची एसआयटीच्या माध्यमातून चौकशी करण्याची मागणी करण्यात आली.**

# संसदेच्या विशेष अधिवेशनात मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावा : पाटील

## आज मराठा समाजाची पंढरपूर बंदची हाक

सुराज्य/पंढरपूर



या महिन्यांमध्ये केंद्र सरकारने विशेष अधिवेशन बोलवले आहे. राज्यात आणि केंद्रामध्ये भाजप प्रणित सरकार आहे मराठा समाजाची मागणीचा विचार करता केंद्र सरकारने मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी आदेश जारी करावा. तसेच पंढरपूर येथे सरकार आपल्या दारी या कार्यक्रमासाठी येताना मराठा समाजाचे दाखले घेऊनच यावे, असे विठ्ठल कारखान्याचे चेअरमन अभिजित पाटील यांनी म्हटले आहे.

मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या मराठा आंदोलकांवर (अंतरवली - सराटी ता.अंबड जि.जालना) येथे पोलिसांनी लाठीचार्ज व गोळीबार केला आहे. घटनेच्या निषेधार्त पंढरपूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सरकारचा मराठा समाजाकडून निषेध करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. छत्रपती शिवाजी महाराज चौक याठिकाणी सकाळी दहा वाजता राज्य सरकारची प्रतिमात्मक तिरडी ठेवण्यात आली होती. यावेळी सरकारच्या या अमानुष लाठीचार्जचा निषेध करुन सरकारच्या जुलमी कारवाईविरोधात संताप व्यक्त करण्यात आला. यावेळी भगिरथ भालके, अभिजीत पाटील, सुभाष भोसले, दिलीप धोत्रे, रामभाऊ गायकवाड, संदिप मांडवे, सुधीर भोसले, सचिन पाटील, मोहन अनपट आदी मराठा समाजातील नेते,पदाधिकारी व समाजबांधव मोठया संख्येने उपस्थित होते. आज पंढरपूर मध्ये जालना येथील लाठीचार्ज चा निषेधार्थ राज्य सरकारच्या पुतळ्याची अंत्ययात्रा पंढरपूर शहरातून काढण्यात आली. महाराष्ट्र सरकारच्या विरोधात पोलीस प्रशासनाच्या विरोधात यावेळी मोठ्या प्रमाणावर घोषणाबाजी करण्यात आली.

# भीमा कारखान्याकडून दहीहंडीपूर्वी ऊस बील अदा

## चेअरमन विश्वराज महाडिक यांनी दिलेला शब्द पाळला

सुराज्य/मोहोळ

भीमा सहकारी साखर कारखान्या मध्ये गाळपास आलेल्या सर्व ऊसाचे प्रति मे. टन २२०० रुपये प्रमाणे अदा करण्यात आल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन विश्वराज महाडिक यांनी दिली.

शनिवार दिनांक २ सप्टेंबर २०२३ रोजी डी.सी.सी बँकेच्या संबंधित शाखांमध्ये २०२२-२३ च्या हंगामात गाळपास आलेल्या सभासद, बिगर सभासद व गेटकेन यांचे ऊसाचे बिल प्रति मे. टन २२०० प्रमाणे जमा करण्यात आले. रोलर पूजन कार्यक्रमावेळी दहीहंडी पूर्वीच ऊसाची बिले देऊ असा दिलेला शब्द चेअरमन विश्वराज महाडिक यांनी पाळल्याने शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त होत आहे.





शासनाचे हमीवर कारखान्यास एन.सी. डी.सी. नवी दिल्ली यांचे मार्फत कर्ज उपलब्ध झाले, त्यातूनच आपण शेतकऱ्यांची बिले अदा करत आहोत असा दुजोरा चेअरमन विश्वराज महाडिक यांनी दिला. या प्रक्रियेत एन.सी.डी.सी चे अधिकारी, राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री, सहकार मंत्री, साखर आयुक्त, प्रादेशिक सहसंचालक व डी.सी.सी बँक प्रशासक यांचे देखील आभार मानले. विशेषतः भीमा परिवाराचे मार्गदर्शक संचालक खासदार धनंजय उर्फ मुन्नासाहेब महाडिक यांनी एन सी डी सी प्रकरण कामी अथक परिश्रम करून सभासदांना न्याय दिला याबद्दल यांचेही आभार मानले.

कारखाना मागील काही वर्षांपासून अनेक नैसर्गिक व मानवनिर्मित अडचणींमधून जात असताना सुद्धा सभासद व बिगर सभासद शेतकऱ्यांनी विश्वास दाखवत मोठ्या प्रमाणात ऊस देऊन सहकार्य केले याबद्दल चेअरमन महाडिक यांनी ऊस उत्पादक शेतकरी बांधवांचा आभारी असल्याचं मत व्यक्त केलं. भीमा कारखाना कार्यस्थळावर इथेनॉल निर्मिती प्रकल्प सुरु करण्यासाठी लागणाऱ्या परवानग्यांची पूर्तता करणे सुरु असून लवकरच भूमिपूजन केले जाईल अशी माहिती देखील चेअरमन विश्वराज यांनी यावेळी दिली.



## कै. मा. आ. ब्रह्मदेवदादा माने यांच्या २१ व्या स्मृतिदिनानिमित्त तसेच एस.पी.एम. पॉलिटेक्निक कॉलेजच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त विविध कार्यक्रम



**सहकार तपस्वी स्व. ब्रह्मदेवदादा माने**
**(संस्थापक, शिक्षण प्रसारक मंडळ, कुमठे)**
**यांच्या**
**पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन**

एस.पी.एम. पॉलिटेक्निक कॉलेज रौप्यमहोत्सवी वर्ष 25

कार्यक्रमाचे अध्यक्ष



**मा. आ. दीपक (आबा) साळुंके- पाटील** (माजी आमदार)

संस्थेचे अध्यक्ष



**मा. श्री. दिलीपरावजी माने**
माजी आमदार



विनीत
**जयकुमार माने (मा. नगरसेवक)**
प्रमुख विश्वस्त, शि. प्र. मंडळ कुमठे, सोलापूर

व्याख्याते



प्रा. नितीन बानगुडे -पाटील



मा. वसंत हंकारे (सांगली)



मा. शरद ठाकरे



मा. संतोष गुमास्ते



मा. करण शहा



डॉ. प्रसन्न खटावकर

**रविवार, दि. ३ सप्टेंबर २०२३**
वेळ: स. १० वा.
विषय: चला नवी पिढी घडवूया...
**प्रा. नितीन बानगुडे- पाटील**

**सोमवार, ४ सप्टेंबर २०२३**
वेळ: स. १० वा.
विषय: बाप समजावून घेताना...
**मा. वसंत हंकारे (सांगली)**

**मंगळवार, दि. ५ सप्टेंबर २०२३**
Leaders Conclave
सत्र पहिले: स. १० वा.
१) मा. शरद ठाकरे
(व्यवस्थापक संचालक, एल.एच.पी.प्रा. लि., सोलापूर)
२) मा. संतोष गुमास्ते
(प्लँट हेड, किर्लोस्कर फेरस लि., सोलापूर)
सत्र दुसरे: स. ११.३० वा.
१) मा. करण शहा
(कार्यकारी संचालक, प्रिसीजन कॅमशॉफ्ट लि., सोलापूर)

**बुधवार, ६ सप्टेंबर २०२३**
वेळ: स. १० वा.
विषय: विद्यार्थी जीवनातील ताण-तणाव व्यवस्थापन
**डॉ. प्रसन्न खटावकर**
(प्रसिध्द मनोविकार तज्ज्ञ, सोलापूर)

सदर कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.
स्थळ: शिक्षण प्रसारक मंडळ, कुमठे प्रांगण

श्री ग्राफिक्स